# दहावे अवतरण

## अध्याय पहिला

जेव्हा माझा जन्म झाला तेव्हा चहूकडे अंध:कार होता. लोकांना साक्षात्कार कसा द्यावा? हा प्रश्न होता. तेव्हा वाटले, की सामूहिक जागृती हाच मार्ग आहे.

त्या श्री आदिशक्तीचे अवतरण होत्या. सृष्टीच्या निर्मितीचे हे सर्वात महत्त्वाचे कार्य होते. त्यांचा जन्म कलियुगाचा अंत व कृतयुगाची सुरुवात दर्शवतो. त्यांचा उद्देश दैवी प्रेम व व सत्ययुगाची पुनर्स्थापना करणे होता.

जगात पहिल्या महायुद्धाचे परिणाम अजूनही भासत होते व दुसरे महायुद्ध आपले डोके वर काढत होते. भारत ब्रिटिश साम्राज्याखाली पूर्णपणे दबला गेला होता.

पण २१ मार्च १९२३ रोजी दुपारी १२ वाजता एका नवीन युगाचा जन्म झाला. प्रेमाच्या वा आशेच्या ह्या युगात आदिशक्तीचे पदार्पण झाले.श्री.प्रसादराव साळवे व श्रीमती कॉर्नेलिया ह्यांना कन्यारत्न झाले. स्थळ होते मध्यप्रदेश स्थित छिंदवाडा. आपल्या तेजस्वी नातीला पाहताच आजीने तिला `निष्कलंका` असे म्हटले. परंतु निष्कलंका हे मुलाचे नाव असल्याने मुलीचे त्यांनी `निर्मला` असे नामकरण केले.

महाराष्ट्रातील संत गगनगिरी महाराज, ज्यांचा आश्रम कोल्हापूरजवळ गगनबावडा येथे आहे, त्यांनी त्या वेळेस ध्यानावस्थेत पूर्ण श्री चक्र धरतीवर उतरलेले पाहिले. त्यांना तेव्हाच समजले, की हे दृश्य म्हणजे श्री आदिशक्तीचा धरतीवर जन्म झाला आहे. त्यांनी साळव्यांच्या घरासमोर येऊन श्री आदिशक्तीला नमन केले.

नवजात निर्मलाला आपले आपले दैवी स्वरूप अजून कोणाला दाखवायचे नव्हते.

जेव्हा मी जन्म घेतला, मी पाहिले, की संपूर्ण जग अज्ञानाच्या अंध:कारात आहे. जगात हिंदू, मुस्लिम, खिश्चन होते, पण ते सत्यापासून खूप दूर होते. ते जातपात व कर्मकांडात हरवले होते. साधक चुकीच्या लोकांकडे जाऊन दिशाहीन झाले होते. मानवाला पूर्णपणे समजण्याकरिता श्री आदिशक्तीने पूर्ण मानव स्वरूपात जन्म घेतला. त्यांनी एका सामान्य माणसाप्रमाणे बालपण, तारूण्य, लग्न, मातृत्व, गृहिणी ह्या सगळ्या भुमिका निभावल्या.

`मला पूर्णपणे एक सामान्य आयुष्य जगायचे होते.`

निर्मलाचे बालपण छिंदवाडामध्ये गेले. त्यांच्या जन्माने साळवे परिवाराची भरभराट झाली. निर्मला घरात सर्वांचीच लाडकी होती. निर्मला चार वर्षांची असतांना साळवे परिवाराचे नागपूरला स्थलांतर झाले. श्री.साळवे नागपूरला वकिली करू लागले. पण जसा जसा स्वातंत्र्यलढ्याने वेग घेतला श्री.साळवे महात्मा गांधींबरोबर काम करू लागले. साळवे खिश्चन असल्याने नागपुरातील खिश्चन लोकांनी त्यांना बहिष्कृत केले. पण त्यांनी स्वातंत्र्यलढा सोडला नाही. त्यांनी `रावसाहेब` ही ब्रिटीशांनी दिलेली पदवी त्यागली. विलायती सूट जाळून ते खादीचे कपडे घालू लागले. बरेचदा तुरूंगातही जावे लागले. साळवे परिवार आता आलिशान बंगल्यातून एका झोपडीत राहू लागला. प्रत्येकाकडे फक्त दोन जोडी कपडे असत. पण कोणीही तक्रार केली नाही. देशाकरिता आनंदाने श्री माताजींनी सर्वत्याग केला व त्यांना त्याचा अभिमान होता. मातृभूमीकरिता त्याग करण्यास मिळतो, याचे साळवे परिवारास अहोभाग्य वाटे.

श्री.साळवे जरी पेशाने वकील होते, अकरा भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते तरी त्यांनी कुराणचा अरेबिक ते हिंदी अनुवाद केला होता. कला, क्रिकेट, पोहणे हे त्यांचे छंद होते.

निर्मला सात वर्षांची असतांना त्यांना खिश्चन शाळेने काढून टाकले. वडील तुरुंगात असल्याने बापूंनी त्यांना आपल्या छत्रछायेखाली घेतले. आश्रमातील बाकीच्या लोकांसारखेच निर्मलाही आश्रमातील सर्व कामे करू लागली. लाडाने गांधीजी त्यांना `नेपाळी` म्हणत. ह्याच वेळी गांधीजींनी `भावांजली` ही भजनावली लिहिली. निर्मलेने आपल्या दैवी कार्याबद्दल गांधीजींना सांगितले. पण गांधीजींनी त्यांना देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत थांबण्याचा सल्ला दिला.

१९४२ साली निर्मलाने विद्यार्थी स्वातंत्र्य

`मी हिटलचे आगमन पाहिले आणि आपला देश पण पारतंत्र्यात होता. देश स्वतंत्र होणे हे महत्त्वाचे होते. म्हणून माझे वडिल, आई आणि मी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी झालो.`

ब्रिटीश तानाशाही बघून श्री माताजींना खूप वाईट वाटे. हे गीत त्यांनी भारतमातेकरिता रचले आहे -

माँ, तेरी जय हो, तेरी ही विजय हो, तेरे गीत से आज जग ये जीवित हो, माँ तेरी जय हो, तेरे गाँव के खेत भी गा रहे हैं, तेरे आज नगरों में जय जय की धून है, तुम्हें देख के ये जगी दीन दुनिया, और वो गा रही है, कि माँ, तेरी जय हो, जब आँखों में आँसू, जुबाँ पे ये छाले ये दिल गा रहा था कि, माँ तेरी जय हो, चितायें हमारी गगन से भिडी थीं वहाँ लिख रही थी, कि, माँ, तेरी जय हो, तेरा ही विजय हो, तेरे गीत से आज जग ये जीवित हो, माँ, तेरी जय हो

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी श्री.विनोबा भावेंनी छोट्या निर्मलेला स्वातंत्र्यलढ्यात भाग न घेणचा सल्ला दिला होता. परंतु त्यांच्या वडिलांनी `ह्या म्हाता-या माणसाकडे लक्ष देऊ नकोस`, असे सांगितले.

त्या वेळेस ह्या तरूण पिढीने शिक्षण त्यागून स्वराज्याकरिता आपले जीवन अर्पण केले. हजारोंनी आपल्या जीवनाचे बलिदान दिले. स्वत: श्री माताजींना बरेचदा तुरूंगात जावे लागले. त्यांना बर्फाच्या लादीवर झोपवून त्रास दिला जाई. परंतु त्यांचा निश्चय कुठेही डगमगला नाही. आपल्या मातृभूमीकरिता कोणतेही बलिदान देण्यास त्यांची तयारी होती.

तरुंगातून बाहेर निघताच श्री माताजींनी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन्सच्या मुलाला बांगड्या भेट दिल्या. कारण त्याने स्वातंत्र्यमोर्चास विरोध केला होता. ह्याकरिता श्री माताजींना कॉलेज मधून निष्कासित केले गेले. कॉलेजचे प्राचार्य (प्रिन्सीपल) श्री.साळवेंचा खूप आदर करीत. म्हणून त्यांनी निर्मलाला स्वत: कॉलेजमधून नाव काढण्याचा सल्ला दिला. तरीही निर्मला झुकल्या नाहीत. ही बातमी जेव्हा तुरूंगात त्यांच्या वडिलांना कळली तेव्हा त्यांनी निर्मलाकरिता कोटाच्या खिशात लपवून अभिनंदन पत्र पाठविले.

महाराष्ट्राबाहेर शिक्षण घेण्याशिवाय निर्मलेजवळ पर्याय नव्हता. त्यांनी लूधियाना मेडिकल कॉलेजमध्ये दाखला घेतला. कारण त्यांना वैद्यकिय विज्ञान (मेडिकल सायन्स) आणि वैद्यकिय भाषा जाणून डॉक्टर लोकांशी बोलायचे होते.

वैद्यकिय अभ्यास पूर्ण होण्याआधीच दि.७ एप्रिल १९७४ ला श्री.चंद्रिकाप्रसाद श्रीवास्तव ह्यांच्याशी निर्मलेचे लग्न झाले. श्रीवास्तव भारतीय परकिय सेवा (इंडियन फॉरेन सर्व्हिस) करिता निवडले गेले होते, पण निर्मलाने त्यांना भारतीय प्रशासकिय सेवा (इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस) निवडण्यास सांगितले. कारण नुकतेच भारतला स्वातंत्र्य मिळाले होते. आपल्या देशाचे निर्माण करणे ही सध्याची गरज आहे असे त्यांचे म्हणणे होते.

श्री.श्रीवास्तव हे उत्तरप्रदेशातील जमिनदार घराण्याचे एकमेव वारस होते. परंतु जमीन कायद्यानुसार स्वातंत्र्यानंतर त्यांना त्यांची जमीन सरकारजमा करावी लागली. लग्नानंतर निर्मलेच्या पावलांनी सुख व समृद्धी श्रीवास्तव घराण्यात परत आली. आपल्या सासरी श्री माताजी पटकन सर्वांच्या लाडक्या झाल्या. एकावेळेस वीस चुलत भावंडं त्यांच्याबरोबर रहात असत. सर्वांचे शिक्षण, नोकरी, लग्न ह्या जबाबदा-या श्री माताजी आईप्रमाणे पार पाडत. समस्त श्रीवास्तव परिवार मनापासून श्री माताजींवर प्रेम करीत.

# अध्याय दुसरा

श्री.श्रीवास्तवांना आपल्या पत्नीच्या अष्टपैलूत्व आणि प्रतिभेचे कौतूक होते. कोणतीही समस्या त्या सहजपणे सोडवत असत. श्रीवास्तवांच्या नेहमी बदल्या व्हायच्या. त्यांनी एकूण वीस घरे बदलली. घरातले सामान येईपर्यंत श्री माताजी जे असेल त्यातच आनंदाने संसार करीत. साक्षात गृहलक्ष्मीच त्या! पाककलेतसुद्धा त्या निपूण होत्या.

त्यांच्या सरकारी बंगल्याच्या बागेत त्या स्वत: भाज्या व फळे उगवीत. चैतन्यमय बियाण्यांचे उत्पन्नही भरपूर होई. कृषीस्पर्धेत त्यांच्या भाज्या व फळांना बरीच बक्षिसे मिळाली आहेत. घरातील नोकरमाणसांना ही त्या कुटुंबियांसारखेच प्रेम देत.

श्री माताजींना दोन मुली आहेत. कल्पना व साधना.

श्री माताजींच्या स्पर्शात अद्‌भूत शक्ती होती. त्या हात लावताच लोकांचे आजार बरे होत. पण आपल्या शक्त्यांबद्दल त्या कधीही बोलत नसत. सहजयोग सुरू करण्याआधी त्यांना मानवाचा पूर्णपणे अभ्यास करायचा होता. ह्याला सत्तेचाळीस वर्षे लागली. ह्या आधी आलेल्या संतांनी दिलेले ज्ञान मनुष्याच्या अहंकाराने व बुद्धीने पूर्णपणे बदलले होते. मोहम्मद साहेब व ख्रिस्त यांनी सांगितलेले ज्ञान फक्त कुराण आणि बायबल बनून राहिले होते.

प्रत्येक धर्म त्याच्या रचनाकारापासून फारच वेगळा झाला होता. धर्म, सत्ता आणि पैसा कमवण्याचा उत्तम मार्ग झाला होता. धर्म देवाबद्दल बोली पण मानवाला देवाशी एकरूप करू शकले नाही.

आत्मसाक्षात्काराशिवाय साधक मध्यमार्गावर येणे शक्य नव्हते. आत्मसाक्षात्कार हा देवाशी एकरूप होण्याचा एकमेव मार्ग होता.

# अध्याय तिसरा

१९६४ साली पंतप्रधान श्री.लालबहादूर शास्त्री ह्यांनी श्री.श्रीवास्तवांना आपला संयुक्त सचिव (जॉइंट सेक्रेटरी) म्हणून नियुक्त केले.

`त्यावेळेस मी जास्त काही करू शकले नाही. कारण माझे पती सरकारी नोकरीत होते. परंतु त्यांच्या नोकरीमुळे मला बरेच काही बघायला मिळाले. शास्त्रीजींना वाटे, की नोकरीकरिता आमच्या पारिवारीक जीवनाचा त्याग होत आहे, पण आम्हाला असे कधीच वाटले नाही. आपला देश घडविणे हे आपले कर्तव्य आहे.`

श्री माताजी शास्त्रीजींची व आपली पहिले भेट आठवत होत्या. `मी त्यांना पहिल्यांदा पाहिले तेव्हाच मला कळले होते, की ते एक इव्हॉल्व्ड स्पिरीट आहेत. त्यांच्यासारखा माणूस राजकारणात असणे ही फार चांगली गोष्ट होती.` शास्त्रीजींनीही श्री माताजींना ओळखले. जेव्हा त्यांना श्री माताजींनी आत्मसाक्षात्कार दिला तेव्हा त्यांनी श्री माताजींचा चरणस्पर्श केला. त्यांनी श्री माताजींना विचारले, आपण काय करावे? त्या म्हणाल्या, `माझे पहिले प्राध्यान्य आहे माझ्या मुलांना अन्न व पाणी. नंतर घरदार व शिक्षण.

शास्त्रीजींनी सर्वांची मने जिंकली होती. देशभक्ती व प्रेमाने परिपूर्ण होते. पण वेळेस सिंहासारखे धैर्य दाखवून त्यांनी पाकिस्तानला हरवले. त्यानंतर ताश्कंदमध्ये पाकिस्तानशी शांती करार केला. पण दुर्दैवाने त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांने निधन झाले.

ह्या दु:खाच्या वेळेस श्री माताजी व श्री.श्रीवास्तव शास्त्री परिवाराबरोबर राहिले. श्रीवास्तवांनी शास्त्रींजीवर एक पुस्तकही लिहिले आहे.

१९६६ साली श्री.श्रीवास्तवांची बदली मुंबईला शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष म्हणून झाली. श्री माताजींनी स्वत: जहाजांची सजावट पाहिली. त्या सर्वांना प्रेमाने जेऊ घालत. शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या कर्मचा-यांकरिता तर त्या आईस्वरूपच झाल्या होत्या.

त्या शांतपणे सर्वांच्या समस्या समजून घेत. त्या समाजकार्य ही खूप करीत. अंधशाळेच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांना समजले, की समाजकार्य करतानाही लोकांची मने बंद होती. त्यांनी लोकांच्या प्रकृतीचा सुक्ष्मरितीने अभ्यास केला व समजले, की अहंकार व प्रतिअहंकाराने संतुलन बिघडले होते.

त्यांच्या मुली कल्पना व साधना ह्यांची शिक्षणे पूर्ण होताच त्यांची लग्ने झाली. ह्यानंतर श्री माताजींनी आपले दैवी कार्य सुरू केले.

१९७० साली जबलपूरला त्या आपल्या भावाकडे गेल्या होत्या. भावाने त्यांची ओळख तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक रजनीश यांच्याशी करून दिली. रजनीशनी त्यांना आदिशक्ती म्हणून ओळखले व नतमस्तक झाले. त्यांनी ४ मे ला त्यांच्या नारगोळ सेमिनारकरिता श्री माताजींना आग्रहाचे आमंत्रण दिले. श्री.श्रीवास्तवांनी माताजींची रहायची सोय एका पारशी मित्राच्या बंगल्यात केली. त्यांच्या सोबत त्यांचे दोन पुतणेदेखील नारगोळला गेले.

नारगोळच्या समुद्राकाठी एका झाडाखाली बसून श्री माताजींनी रजनीशना साधकांना मोहीत करतांना पाहिले. त्याच वेळेस अबोध साधकांना अगुरू व कुगुरूपासून वाचविण्याकरिता सहस्रार उघडण्याचा निर्णय घेतला. `मला कळले, की त्या वेळेस सहस्रार उघडले नसते तर देवाला शोधणारे सर्व साधक अंध:कारात हरवले असते, पण त्यांचे सहस्रार उघडल्यावर ते परमात्म्याशी एकरूप होऊ शकतील व त्यांच्या सर्व समस्या सहज सुटतील व ते आनंदी होतील.` आत्मसाक्षात्काराशिवाय परिवर्तन होऊ शकत नाही.

मंगळवार दि.५ मे १९७० साली रात्रभर एका सरूवृक्षाखाली बसून त्या आपल्या दैवी अवतारात विलीन झाल्या. सकाळच्या पहिल्या प्रहरी त्यांनी जगाचे सहस्रार उघडले व कुंडलिनी जागृतीचा मार्ग काढला. `पूर्ण वातावरण परम चैतन्याने भरून गेले. आदि कुंडलिनी जागृत झाली. सर्वत्र निरानंद पसरला. कुंडलिनीचे ब्रह्मरंध्र भेदले. सर्व चक्रे उघडली.`

दि.५ मे १९७० साली सहजयोगाचा प्रारंभ झाला.

# अध्याय चौथा

श्री माताजींनी आपले सामूहिक जागृतीचे कार्य सुरू केले. जात-पात, रंग, धर्म वगैरे कोणताही भेदभाव न करता त्यांची करूणा एक निर्मळ नदीप्रमाणे सर्वांवर वाहू लागली. ह्या निर्मळ प्रेमाच्या नदीतून पाणी घेण्यास आपला घडा मात्र रिकामा हवा.

कुंडलिनीचे ज्ञान आधी कोणी सामूहिकतेत सांगितले नाही. कारण तेव ती वेळ नव्हती. नाथपंथींनी हे ज्ञान फक्त आपल्या शिष्यांनाच दिले. ज्ञानेश्वरही कोणाला आत्मसाक्षात्कार देऊ शकले नाहीत. कबीर, तुलसीदान, रमन महाऋषी, सुफी ह्या सर्व महान संतांनी आपल्या कवितेतून हे ज्ञान सांगणचा प्रयत्न केला. लोक त्यांची गाणी म्हणत, पण त्याचा खरा अर्थ कोणाला समजलाच नाही. कुंडलिनी जागृती हा एक अनुभव आहे. जो आपल्या केंद्रीय मज्जासंस्थेवर (सेंट्रल नर्व्हस सिस्टीम) अनुभवता येतो.

सामूहिक कुंडलिनी जागृती फक्त श्री माताजीच देऊ शकल्या. कारण त्या आदिशक्ती आहेत व त्यांचे अवतरण ह्या करिता झाले होते.

एकदा श्री माताजींनी गगनगिरी महाराजांना भेटायला त्यांच्या आश्रमात गगनबावड्याला जाण्याचे ठरविले. गगनबावडा हे कोल्हापूर जवळ एका टेकडीवर होते. टेकडीवर चढणे अवघड होते. श्री माताजींनी आपल्या भक्तांना सांगितले, की गगनगिरी महाराज एक अद्‌भूत आहेत. टेकडी चढतांना जोरात पाऊस येऊ लागला व श्री माताजी पूर्ण ओल्या झाल्या. आश्रमात पोहोचताच महाराजांनी श्री माताजींना विचारले, की त्यांनी पाऊस का थांबवला नाही? त्या म्हणाल्या, तुम्ही माझ्याकरिता साडी आणली आहे. आता ती मला घालावी लागेल. गगनगिरी महाराजांनी आपल्या भक्तांना सांगितले, की त्या स्वयं आदिशक्ती आहेत.

श्री माताजींची ख्याती सर्वत्र पसरू लागली. मुंबईला श्री माताजींना भेटायला एक गुजराथी महिला आल्या. त्यांचे नाव राऊळबाई. श्री माताजींनी त्यांना जागृती दिली. आत्मसाक्षात्काराच्या अनुभवाबद्दल राऊळबाई म्हणाल्या, `कुंडलिनी जागृती होताच माझी चेतना पण जागृत झाली. माझ्या हातातून थंड चैतन्य लहरी वाहू लागल्या. माझ्या डोळ्यात तेज आले व मला समजले, की ह्या चैतन्य लहरींचा स्रोत श्री माताजी आहेत.`

त्यानंतर बोर्डीला सहजयोगाचा कार्यक्रम झाला. त्यात गुजरातचे चंदूभाई झवेरी ह्यांना आत्मसाक्षत्कार मिळाला. झवेरींबरोबर श्री.आडकर व त्यांचे काही मित्र श्री माताजींच्या जीवन ज्योतच्या घरात ध्यानास जाऊ लागले. हळूहळू ही संख्या वाढू लागली.

ह्या लोकांमुळे श्री माताजींना मानवाच्या चक्रांचे क्रमांतरण व संयोजन (पर्म्यूटेशन अँड कॉम्बिनेशन) कळू लागले. आपला आत्मा हे सदाशिवाचे प्रतिबिंब आहे. म्हणन आत्मसाक्षात्कारानंतर सगळ्यांनाच थंड चैतन्य लहरींचा अनुभव येतो. सगळ्यांची सामूहिक चेतना जागृत होते.

चंदूभाईंनी श्री माताजींना विचारले, `तुम्हाला हे ज्ञान कधी मिळाले?` श्री माताजी म्हणाल्या, `मी जन्माला आले तेव्हाच मला हे माहीत होते. लोक श्रीकृष्ण, मोहोम्मद साहेब, येशू ह्यांना मानतात पण त्यांनी काय शिकविले हे कोणीच आत्मसात करीत नाही. कारण ते परमात्म्याशी एकरूप नसतात.`

हळूहळू जीवनज्योतमध्ये ध्यानास येणा-या लोकांची संख्या बारा वरून पस्तीस वर आली. आता सामूहिक जागृतीची वेळ आली होती. सहजयोग सुरू करायचा होता. सहज, सह म्हणजे आपल्या बरोबर व ज म्हणजे जन्मलेला. चंदूभाईंनी सहजयोगाचे कायदे विचारले. श्री माताजी म्हणाल्या, काहीही कायदे नाहीत. भक्ताने आपला आत्मसाक्षात्कार घ्यावा. प्रकाश येताच अंधारात हातात असलेला साप आपण झटकन सोडून देऊ. मला तुम्हाला काहीही सांगायची गरज पडणार नाही. श्री माताजींना आपल्या शिष्यांबरोबर कोणतीही सक्ती बाळगायची नव्हती. परिवर्तनाकरिता प्रत्येकाला आपले स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे, असे त्या म्हणत.

चंदूभाईंनी सहजयोगाला कायदेशीर संस्था करण्याचा विचार मांडला. त्याचे नाव अनंत जीवन वा लाइफ इटर्नल ट्रस्ट असे श्री माताजींनी सांगितले.

श्री.बि.जी.प्रधान हे एक वकील होते व श्री माताजींचे निस्सिम भक्त. त्यांनी लाइफ इटर्नल ट्रस्टचे काम पाहिले. श्री माताजींनी सांगितले होते, की सहजयोग हा काही व्यवसाय नाही व आत्मसाक्षात्काराकरिता कोणीही पैसे घ्यायचे नाही.

८ मार्च १९७२ साली संस्थेची नोंदणी झाली.

सहजयोगाच्या कार्यक्रमाकरिता हॉल शोधण्याचे काम सुरू झाले. मुंबईत भाडे फार जास्त होते. झवेरी भाईंनी प्रवेश शुल्क ठेवण्याचा विचार मांडला, पण श्री माताजी म्हणाल्या, दैवी कार्याकरिता पैसे घेऊ किंवा देऊ शकत नाही. श्री माताजींनी स्वत:चे

पैसे देऊन जहांगीर हॉल भाड्याने घेतला. त्या कार्यक्रमाला १५० साधक आले. श्री माताजी त्यावेळेच्या अगुरु व कुगुरुंविषयी स्पष्टपणे बोलल्या. चंदूभाईंना श्री माताजींच्या सुरक्षिततेची भीती वाटू लागली. श्री माताजींनी त्यांना शांत केले व म्हणाल्या, प्रेमाच्या शक्तीत खूप ताकद असते. नकारात्मक लोक माझ्यासमोर कसे हलतात तुम्ही पाहिले नाही का?

श्री माताजींनी स्वत:ची कुंडलिनी चढून मग साधकांची कुंडलिनी चढवली आणि त्यांच्या बाधा आपल्या शरीरात ओढून घेतल्या. त्यानंतर माताजींनी प्रत्येक साधकावर तो पर्यंत काम जोपर्यंत त्याला थंड चैतन्य हली जाणवल्या नाही. लोकांना आश्चर्य वाटले. ह्यात कोणतीही जादू नव्हती. लोकांना हातावर व ब्रह्मरंध्रावर चैतन्य जाणवू लागले.

एकदा बी.जी.प्रधानांची कोर्ट केस होती. पण ते माताजींचे कार्यक्रम आयोजित करण्यात इतके गुंतले होते, की ते कोर्टकेसबद्दल पूर्णपणे विसरून गेले. ज्या माणसाची केस होती तो दुस-या दिवशी प्रधानांना केस जिंकल्याबद्दल धन्यवाद देण्यास आला. तेव्हा प्रधानांना कळले, की हे श्री माताजींचे आशीर्वाद आहेत, की ते एकाच वेळेस दोन ठिकाणी हजर होते.

जसजशी साधकांची संख्या वाढू लागली, तसतसे जीवनज्योत छोटे पडू लागले. त्यानंतर साप्ताहिक सामूहिक ध्यान भारतीय विद्या भवनमध्ये होऊ लागले.

जेव्हा श्री माताजी स्वत: उपस्थित नव्हत्या, त्यांचा फोटो ठेऊन साक्षात्काराचे कार्य करण्यात येई. लोकांना ह्यात शंका वाटली. पण जेव्हा त्यांनी पाहिले, की फोटोतूनही चैतन्य वहात आहे, तेव्हा त्यांची श्रद्धा आणखीनच वाढली. श्री माताजी म्हणाल्या, फोटो म्हणजे मी स्वयं आहे. मला ओळखा व सामूहिक चेतनेत आपला आत्मसाक्षात्कार प्रबळ करा. फक्त फोटोनेच हजारो साधकांना त्यांचे आत्मसाक्षात्कार मिळाले.

बडोद्यातील प्रख्यात श्री दिवाण साहेब ह्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. एक नवीन साधक विष्णू महंते ह्यांना कर्करोग झाला होता. श्री माताजी हॉस्पिटलमध्ये पोहोचेपर्यंत त्यांचे निधन झाले होते. पण श्री माताजींच्या दैवी चैतन्याने त्यांचे प्राण परत आले व त्यांनी डोळे उघडले. श्री माताजी म्हणाल्या, मी काहीच करीत नाही. परंतु माझ्या चैतन्याने लोकांची प्रकृती आपोआप सुधारते. योगीजनांनी दुर्गापूजेसाठी परवानगी मागितली. समुद्राकाठी श्री माताजींची श्री दुर्गा स्वरूपात पूजा झाली.

सहजयोग्यांकरिता त्या श्री माताजी होत्या, पण त्यांच्या पतीच्या ऑफिसच्या लोकांकरिता त्या श्रीमती श्रीवास्तवच होत्या.

श्री माताजी असतांना दिल्लीला श्री मडप्पा, मंडीचे महाराज व आयकर विभागाचे आयुक्त श्री.वेणूगोपाल ह्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. वेणूगोपालांना सर्व सोडून श्री माताजींच्या सेवेत राहायचे होते. पण गृहस्थावस्थेत राहून सहजयोग करण्यास श्री माताजींनी त्यांना सांगितले.

दिल्ली्या महानगरपालिकेचे सहाय्यक कलेक्टर श्री.वर्मा ह्यांना मद्यपान सोडून सहजयोग करण्यास श्री माताजींनी सांगितले. सहजयोग करीत असतांना त्यांच्या पत्नी ज्या बरीच वर्षे आजारी होत्या, आपोआप ठीक झाल्या.

मुंबईला परत येतांना श्री राजवाडे ह्यांनी पुण्याला कार्यक्रम करण्याची परवानगी मागितली. ह्या कार्यक्रमाला हजारोंनी साधक आले व जागृती घेतली. पुण्यात राजवाड्यांच्या वाड्यावर सहजयोगाचे ध्यान केंद्र सुरू झाले.

अमेरिकेच्या साधकांना जागृती मिळाली पाहिजे असे श्री माताजींना नेहमी वाटे.

१९७२ साली आपल्या सोन्याच्या बांगड्या विकून अमेरिकेचा प्रवास सुरू केला. जहाजावर कोणाला न्यूमोनिया झाला असता श्री माताजींनी त्याला त्वरीत बरे केले. हे पाहून जहाजावरच्या सर्व प्रवाश्यांनी आत्मसाक्षत्काराची विनंती केली.

अमेरिकेत साधकांची दशा बघून श्री माताजींना खूप वाईट वाटले. अगुरूंनी साधकांना सत्यापासून खूप दूर नेले होते. पण श्री माताजींच्या करूणेत त्यांचा दुसरा जन्म झाला व सर्वांना जागृती मिळाली.

## अध्याय पाचवा

अमेरिकेहून परत येताच राऊळबाईंनी धुळ्याला कार्यक्रमाची विनंती केली.

श्री माताजी राऊळबाईच्या घरी रहात असता एक इसम तिथे आला, `श्री आदिशक्ती इथे रहात आहेत का?`

`हो.`

`त्या खरच कुंडलिनी जागृती करतात का?`

`हो`

`माझ्या गुरूंना त्यांना भेटायचे आहे.`

एका आठवड्याने ते गुरू श्री माताजींना भेटायला आले. श्री माताजींना एक साधारण गृहिणी स्वरूपात पाहून ते निराश झाले, पण चैतन्य जाणवताच त्यांनी माताजींना साष्टांग नमन केले.

२८ ऑगस्ट १९७३ ला श्रीकृष्ण पूजा मुंबईत झाली. त्या पूजेत प्लास्टिकची भांडी वापरल्याने श्री माताजींना खूप त्रास झाला. पूजेनंतर श्री माताजींनी सर्व द्रव्याचे महत्त्व सांगितले व म्हणाल्या की, चांदीची भांडी पूजेत वापरावीत.

## अध्याय सहा

१९७४ मध्ये श्री श्रीवास्तव इंटरनॅशनल मेरीटाइम ऑर्गनायझेशनचे महासचिव (सेक्रेटरी जनरल) म्हणून नियुक्त झाले व ते लंडनला रहायला गेले. श्री माताजींनी राजदूताच्या पत्नीची जबाबदारी पूर्णपणे पार पाडली. पण पाश्चात्य संस्कृती त्यांना पटायची नाही. ह्या कृत्रिम सामाजिक जीवनातही त्यांनी त्यांचे कार्य सोडले नाही. त्या वारंवार भारतात येत राहिल्या व लंडनमध्येही जागृतीचे कार्यक्रम घेत होत्या.

एक दिवस बाजारात एक तरूण मुलगा त्यांना रस्त्यावर पडलेला दिसला. तो आजारी होता व खायला-प्यायला पैसे नव्हते. श्री माताजी त्याला आपल्या घरी घेऊन आल्या व खाऊ घालून, स्वच्छ अंघोळीनंतर श्रीवास्तवांचे कपडे घालायला दिले. दौ-याहून परत आल्यानंतर एका अज्ञात मुलाला आपल्या घरी, आपल्या कपड्यात पाहून श्रीवास्तवांना आश्चर्य वाटले.

श्री माताजींनी बरेच आठवडे त्या मुलाची काळजी घेतली व त्याचबरोबर त्याच्या दुस-या हिप्पी मित्रांनाही अनुकंपेने सांभाळले. त्या सर्वांना आत्मसाक्षात्कार दिला. त्यांची चक्रे ठिक केली व स्वत:च्या पैशाने त्यांच्याकरिता आश्रम स्थापित केला. सात हिप्पी मुलांचे परिवर्तन पाहून श्रीवास्तव साहेब आश्चर्यचकित झाले. त्यांनी त्यांच्या पत्नीच्या कार्यास पूर्णपणे पाठिंबा दिला.

आत्मसाक्षात्कारानंतर त्या मुलांचे सहस्रार उघडले व परमानंद प्राप्त झाला. चैतन्य लहरींच्या जाणिवेने त्यांचा आत्मविश्वास परत जागा झाला. सहजयोगामुळे त्यांची व्यसने सुटली. तीन वर्षे श्री माताजींनी त्यांच्यावर खूप मेहनत घेतली. आदिशक्तीच्या आशीर्वादाने त्या सर्वांना नोकरी मिळाली व ती जीवनात यशस्वी झाली.

डिसेंबरमध्ये श्री माताजी भारतात परतल्या तेव्हा कॉन्स्टिट्यूशन हॉल, दिल्ली येथे श्री.वेणूगोपालनी सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन केले.

दिल्लीत सहा दिवस श्री माताजी लोकांना कुंडलिनीचे ज्ञान देत होत्या. कुंडलिनी ही आपली शुद्ध इच्छा आहे आणि जोपर्यंत आपल्या सांसारिक इच्छा लूप्त होत नाहीत तोपर्यंत आपले चित्त त्यातच अडकून राहील. श्री माताजींनी साधकांचे चित्त शुद्ध केले. त्यांचे चित्त पैसा व सत्ता ह्या पलीकडे नेले. सातव्या दिवशी सगळ्यांना आत्मसाक्षात्काराने आशीर्वादित केले.

`दिल्लीचे लोक पैसा व सत्तेच्यामागे धावतात. मी वाट पाहिली, की ह्याचे चित्त आत्म्याकडे कधी जाईल? हे खूप कठीण होते. त्यांची कुंडलिनी उचलणे म्हणजे पर्वत उचलल्यासारखे होते. लोकांमध्ये खूप अहंकार होता व त्या अहंकारात ते मूर्खासारखे प्रश्न विचारत.`

९ फेब्रुवारी १९७५ला श्री माताजींनी मुंबईला आशीर्वादित केले. त्या पूजेत निर्विचारिता कशी स्थापित करायची, हे श्री माताजींनी सांगितले. `प्रार्थना करा, देवाकडे क्षमा मागा व तुम्ही सर्वांना मनापासून क्षमा करा.`

मार्चमध्ये त्यांच्या वाढदिवसानंतर श्री माताजी लंडनला परत गेल्या. राजेश शाह यांनी त्यांना अमेरिकेहून फोन करून सांगितले, की त्यांचा स्विस मित्र ग्रेगॉर ला आत्मसाक्षात्कार घ्यायचा आहे. त्यांनी त्याला लंडनला बोलावले व अशा रीतीने स्वित्झर्लंड व बाकी यूरोपमध्ये सहजयोग पसरू लागला.

मार्च १९७६, दिल्लीमध्ये सहजोगाची `कुंडलिनी जागृती` ह्या नावाने जाहिरात झाली. जाहिरात पाहून एक संशयी माणूस तिथे आला व कार्यक्रमाची निंदा करू लागला, पण कुंडलिनी चढताच त्याला चैतन्य जाणवले व तो शांत झाला. त्याला लाज वाटली व त्याने श्री माताजींची माफी मागितली. माताजींनी त्याला प्रेमाने थोपटले व पाडव्याच्या पूजेला यायला सांगितले.

पूजेत प्रार्थना व मंत्र म्हटल्याने आपले शरीर चैतन्यमय होते.

# अध्याय सातवा

सहजयोग प्रचार-प्रसार कार्यक्रम

फेब्रुवारी १९७७ मध्ये दिल्लीत खूप सार्वजनिक कार्यक्रम झाले. २१ मार्च ला भक्तिभावाने श्री माताजींचा वाढदिवस साजरा झाला. आपल्या मुलांचे प्रेम पाहून माताजींना गहिवरून आले.

लंडनला परतल्यानंतर श्री माताजींनी पाहिले, की तिथल्या योगीजनांनी आपले आत्मसाक्षात्कार व चैतन्य फारच गृहित घेतले होते. जर आपण आपल्या चैतन्याकडे लक्ष दिले नाही, तर ते लुप्त होतात.

श्री माताजींनी अत्यंत संयम व करूणेने नवजात बालकासारखे परत सगळ्याकडे लक्ष दिले. त्यांचे चक्र शुद्ध केले व परत त्यांचे चैतन्य जागृत केले.

लंडनमध्ये काही ऑस्ट्रेलियन साधकांना जागृती मिळाली. आपल्या मायदेशी, ऑस्ट्रेलियात, जाऊन त्यांनी सहजयोग सुरू केला.

श्री माताजी आणि साधकांमध्ये एक अद्वितीय नाते होते. ते एका कठोर गुरू-शिष्याचे नसून एका करूणामयी आई व बालकाचे होते. २४ ऑक्टोबरला कॅक्स्टन हॉल, लंडनमध्ये २०० साधकांना एकदम आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला.

सहजयोगी श्री माताजींच्या शरीरातील अणू-रेणू होतात. बिजापासून रोपटे व त्यानंतर कल्पवृक्ष इतक्या प्रेमाने व सहजपणे करण्याचे कार्य फक्त महामायाच करू शकते.

साधकाचे चक्र शुद्ध करण्याकरिता श्री माताजींना स्वत:चे चक्र कार्यान्वित करावे लागले. एका मराठी पत्रात श्री माताजी लिहितात, `मला सामूहिक इडा नाडी शुद्ध करायला तीन दिवस लागले. दररोज मला पन्नास उलट्या होत. पण शेवटी इडा नाडी शुद्ध झाली.`

इडा नाडी नंतर सामूहिकतेची पिंगला नाडी शुद्ध करण्यात आली. फक्त आत्मसाक्षात्काराने हे काम अशक्य होते. साधकांना गुरूकुलमध्ये राहून खूप वर्षे हे कार्य करावे लागले. पण आता सामूहिक चेतनेत श्री माताजींनी सर्वांची शुद्धि एकत्र केली.

सहयोगाचे नियम विचारता श्री माताजी हसत म्हणाल्या, सहजयोगाचे नियम खूपच `सहज व सरल आहेत. पहिले म्हणजे परमात्म्याशी एकरूप व्हा.` काही योगींनी सहजयोगात नवीन मंत्र सुरू केले. श्री माताजींनी ताकीद दिली. काहीही नवीन सुरू करू नका. आधुनिक मन व बुद्धी काहीतरी नवीनच्या शोधात असते. परंतु सहजयोग हा पारंपारिक आहे.

# अध्याय आठवा

नोव्हेंबर १९७७ मध्ये श्री माताजी मुंबईला परतल्या. त्यांना कळले, की योगींनी श्रीमती मथानी ह्यांचे पार्श्वभागाचे हाड मोडले होते, त्याची शस्त्रक्रियासुद्धा झाली. परंतु त्यांना कधीही चालता येणार नाही, असे डॉक्टरांनी सांगितले. श्री माताजींनी आपले चरणकमल मथानी ताईंच्या त्या भागावर ठेवले व त्या पूर्णपणे ब-या झाल्या व परत चालू लागल्या. जय श्री माताजी!

आतापर्यंत सामूहिक जागृतीचे कार्यक्रम श्री माताजी स्वत: घ्यायच्या. कारण योगींना आत्मसाक्षात्कार द्यायच्या आत्मविश्वास नव्हता. नासिकच्या कार्यक्रमाला जातांना श्री माताजींची कार बिघडली. तिकडे जमलेली जनता अस्वस्थ होऊ लागली. तेव्हा उपस्थित सहजयोग्यांनीच लोकांना जागृती दिली. श्री माताजींना खूप आनंद झाला, की त्यांच्या मुलांनी स्वत:ची शक्ती ओळखली.

आता दुसरी पायरी चढायची वेळ आली होती.

मार्च १९७८ मध्ये भारत व विदेशी चाळीस सहजयोग्यांना घेऊन श्री माताजी हरिद्वारला गेल्या. तिथे गंगाकिनारी एका धर्मशाळेत सगळे रहात असत. सकाळ-संध्याकाळ गहन ध्यान होत. गंगेसारखीच सगळ्यांची कुंडलिनी वाहू लागली व निर्विचारिता स्थापित झाली. ध्यानात परिपक्व व्हायला निर्विचारिता स्थापित झालीच पाहिजे. वर्तमान हे निर्विचार स्थितीत असते. श्री माताजींनी सांगितले, की निर्विचार स्थिती शांती व साक्षीभाव देते. ज्याने आपण जीवनाचा पूर्ण आनंद घेऊ शकतो.

`हरी की पायरी` मध्ये श्री माताजी गंगेत उतरल्या व सर्व योग्यांना त्यांच्या चरणपूजेचे सौभाग्य प्राप्त झाले. स्वत: गंगा नदी आदिशक्तीचे चरणकमल धूण्यास उत्सुक होती.

असेच मुंबईजवळ गोराई खाडीत पण घडले.

सहस्रार पजा १९८३ नंतर श्री माताजी संध्याकाळी समुद्राकाळी फिरायला गेल्या. त्यांनी वाळूत गणेशांची मूर्ती बनवली व त्याला कुंकु लावले. त्या वेळेस समुद्राच्या लाटा आनंदाने श्री माताजींचे चरण स्पर्श करायला आल्या. असे सात वेळा झाले व सातव्यांदा लाटा वाळूचा गणेश आपल्याबरोबर घेऊन गेल्या. जणू गणेश विसर्जनच होते. हे पाहता श्री माताजींच्या चेह-यावर स्मितहास्य आले.

१८ डिसेंबर १९७८ ला लंडनमध्ये खिसमस पूजेत सामूहिकतेचे आज्ञा चक्र आशीर्वादित झाले.

जानेवारी १९७९ मध्ये दिल्लीत खूप प्रचार-प्रसाराचे कार्यक्रम झाले. तेव्हा श्री माताजी आपल्या मुली कल्पना व जावई रोमील वर्मा, ह्यांच्याबरोबर `सर्व प्रिया विहार` मध्ये राहिल्या. त्याच्या जावयाने अत्यंत आदराने कार्यक्रमाचे सर्व आयोजन केले.

दिल्लीचे हृदय चक्र उघडण्याकरिता श्री. वर्मा ह्यांच्या गच्चीवर एका पूजेचे आयोजन करण्यात आले. ह्या वेळेस पूजेचे शिष्टाचार माताजींनी योगीजनांना समजावले. प्रत्येक योग्याला पंचामृताने आदिशक्ती चरणपूजनाचे सौभाग्य मिळाले.

त्यानंतर श्री माताजी इंग्लंडला परत गेल्या. तिकडच्या योग्यांना हृदयपरिवर्तनाकरिता सर्वप्रथम हृदयात नम्रता आणण्यास सांगितले. एक नम्र हृदयच बुद्धिमत्ता, अहंकार व प्रतिअहंकारास मात देऊ शकतो.

ऑक्टोबरमध्ये श्री माताजी मुंबईला परत आल्या व २३ तारखेला नवरात्री पूजा झाली. ह्या पूजेत श्री माताजींनी कुंडलिनी व कल्कीचे महत्त्व समजावले. आपल्या कपाळावर अकरा रूद्र शक्त्या आहेत. एकादश रूद्र. जर हे बाधित असेल तर कुंडलिनी चढत नाही. एकादश रूद्र पकडणा-या माणसाला कर्करोग होऊ शकतो.

# अध्याय नववा

डिसेंबर १९८० मध्ये पहिला भारत दौरा झाला. विदेशी योगीजन, श्री.धुमाळ ह्यांच्या राहुरीच्या उसाच्या मळ्यात राहिले. श्री माताजींनी सांगितले, की त्यांचे पूर्वज राहुरीचे राजे होते व नाथपंथीनीदेखील राहूरीत वास केला होता.

नाथपंथींबद्दल सांगतांना श्री माताजी म्हणाल्या, भवसागरात आदिगुरूंचे अनेक अवतार झाले. गुरूंच्या आशीर्वादाने शिष्यांना मोक्ष मिळाला, म्हणून त्या शिष्यांना अवधूत म्हणत. सोलोमन, डेव्हिड, गुरू वशिष्ठ, दूसरे व तिसरे झोरास्टर, मार्कंडेय, गगनगिरी महाराज, नवनाथ हे सर्व अवधूत होते. नवनाथांना आत्मसाक्षात्काराचा फक्त कुंडलिनी जागृती हाच मार्ग आहे, हे माहीत होते. त्यांनी कुंडलिनीचे ज्ञान बोलिव्हिया व यूक्रेनपर्यंत नेले.

धुमाळ : अवधूतांची पूजा करायची का?

श्री माताजी : नाही, फक्त देवांची पूजा करायची.

धुमाळ : भारतात आता कोणी अवधूत जन्मले आहेत का?

श्रीमाताजी : सहजयोगामध्ये आता बरेच महान आत्मे जन्म घेतील.

सायंकाळी धुमाळांनी जवळच्या एका गावात सामूहिक कार्यक्रमासाठी नेले. श्री माताजी एका झोपडीत गेल्या. तिथे एक गरीब विधवेने त्यांना जेऊ घातले. बाहेर आल्यावर धुमाळांनी त्यांना विचारले, `तुम्ही इथे इतका वेळ का घालवलाता?` ही माझ्या एका प्रिय मुलाची बायको आहे. गावक-यांकडून धूमाळांना कळले, की त्या विधवेचा पती निस्सीम देवी भक्त होता.

गावोगावी श्री माताजी आनंदाने प्रचार-प्रसार करीत. त्यांना स्वत:च्या गैरसोईबद्दल काहीच वाटत नसे. खेड्यांमधून त्यांची ॲम्बेसेडर गाडी धक्के खात जात. जिथे रस्ते नव्हते तिथे त्या बैलगाडीने प्रवास करीत. त्यांना कधीच गैरसोय जाणवली नाही. त्या आजूबाजूच्या सृष्टिसौंदर्याचा आनंद घेत.

नूतनवर्षाच्या कार्यक्रमाहून परत येतांना आकाशात प्रकाश आला व तो प्रकाश श्री माताजींच्या कार बरोबर होता. मध्यरात्रीच्या सुमारास तो प्रकाश तेजस्वी गुलाबी रंगाचा झाला व पूर्ण आकाश त्याने भरून गेले. श्री माताजींनी सांगितले, की आकाश चैतन्याने भरले व कलीयूग संपून सत्ययूग सुरू होत आहे. परम चैतन्य कार्यान्वित झाले होते आणि आता सहजयोग खूप पसरेल.

सकाळी धुमाळांना कळले, की त्यांच्या शेतात दोन चोर आले होते. पण आश्चर्य असे, की ते चोर धूमाळांची माफी मागायला घरी आले. ते म्हणाले, तुमच्या शेतातल्या राखणदाराने आम्हाला खूप मारले. आम्हाला क्षमा करा. पण शेतात राखणदार ठेवलेलाच नव्हता. `ते माझे गण होते. जे तुमची रक्षा करतात,` असे श्री माताजींनी हसत सांगितले.

इतर योगीजनांनी पण त्यांचे अनुभव सांगितले. एक बस खाडीत कोलांट्या खात पडली, पण कोणत्याही प्रवाशाला लागलेसुद्धा नाही. कारण बसमध्ये एक सहजयोगी होता, ज्याने श्री माताजींचे लॉकेट घातले होते. हा चमत्कार पाहून बसमधील सर्व लोकांनी आत्मसाक्षात्कार घेतला.

सहजयोगी प्राण महाजन. एअर इंडियामध्ये तंत्रज्ञ (फ्लाईट इंजिनियर) होते. एकदा आतंकवाद्यांनी त्यांच्या विमानाचे अपहरण केले. श्री.महाजन श्री माताजींचे स्मरण करू लागले. आतंकवाद्यांनी त्यांच्यावर खूप गोळ्या झाडल्या, पण चमत्कार असा, की त्यांना एकही गोळी लागली नाही व काही वेळाने सर्व आतंकवादी पकडले गेले. श्री माताजींनी आपल्याला प्राणदान दिले हे पाहून ते श्री माताजींच्या चरणी नतमस्तक झाले.

श्री माताजी म्हणाल्या, `मी काहीही करीत नाही. मी निष्क्रिया आहे. आत्मसाक्षात्कारांनतर तुम्ही माझ्याशी जोडले जाता जसा एखादा संगणक (कॉम्प्यूटर) मेन ला जोडला जातो. मी फक्त साक्षीभावाने सर्व बघते. परमचैतन्य सर्व कार्य करते.

एका योगिनीने `मिया की टकली` मध्ये घेतलेला श्री माताजींचा चमत्कारी (मिरॅकल) फोटो दाखवला.

मिया हे एक सूफी संत होते. श्री माताजी तिथे जागृती देण्यास गेल्या तेव्हा त्यांच्यावर प्रकाशाची वर्षा होऊ लागली. असे सहा वेळा झाले. सातव्यांदा श्री माताजींनी हात दाखवून तो प्रकाश थांबविला.

मार्च १९८१ ला नी माताजी लंडनला परत गेल्या. चेल्सम रोडच्या कार्यक्रमात त्यांनी सांगितले, की कोणीही समजू नका की कोणी माझ्यावर जास्त किंवा कोणी कमी प्रेम करतं. काही लोकांना विधीसंबंधी जास्त महिती आहे, तर काहींना शिष्टाचार. पण माझ्यावर जो खरं प्रेम करेल तो दुस-यावर पण प्रेम करेल.

गुरूपौर्णिमेच्या पूजेत श्री माताजींनी गुरूपदाचे पूर्ण ज्ञान साधकांना दिले. भक्तांनी पूजेत अर्पण केलेली पांढरी साडी त्यांनी प्रेमाने

घातली.

नंतर श्री माताजी व्हॅनकूव्हर व अमेरिकेच्या दौ-यावर गेल्या.

डिसेंबर २३ ला लंडनमध्ये खिसमस पूजा साजरी झाली. त्यांनतर श्री माताजी भारतात परतल्या.

१७ जानेवारी १९८२ ला इंटरनॅशनल रोटरी क्लबने श्रीमाताजींना परिषदेकरिता आमंत्रित केले. विषय होता सुसंवाद (हार्मोनी), स्थळ अशोक हॉल, दिल्ली. परिषदेत ब्रिटनचे मुख्य न्यायाधीश लॉर्ड टेम्प्लेटन पण हजर होते. परिषदेत पुणे रोटरी क्लबच्या अध्यक्षांना जागृती मिळाली. श्री माताजींनी पंधरा मिनिटे त्यांचे चक्र शुद्ध केले व त्यांची बायपास सर्जरी टळली.

२७ जानेवारीला सोलापूरच्या कार्यक्रमात श्री माताजींनी आचार्य काका भूजांकर सत्त्वाचारी ह्यांनी २००० वर्षांपूर्वी केलेल्या भविष्यवाणीची पुष्टी केली. `एक महायोगी जन्माला येईल, जो पूर्ण परब्रह्म असेल. त्याच्यात सर्व शक्त्या असतील (महालक्ष्मी, महाकाली आणि महासरस्वतीची शक्ती). आचार्यांनी १९७० पासून नवयूगाची सुरूवात होईल आणि १९८० कृतयुगाकडे घेऊन जाईल, असे सांगितले होते. (नववर्ष पूजा १९८०, राहुरीला श्री माताजींनी कृतयुगाची सुरूवात झाल्याचे सांगितले.)

१ फेब्रुवारीला राहुरीला श्री दूर्गापूजा झाली. देवीला पुजेची गरज नाही. पूजा सामूहिकतेकरिता असते.

ऑस्ट्रेलिया, यूरोप, इंग्लंड, अमेरिका व कॅनडाहून सहजयोगी भारतात आले व श्री माताजींबरोबर महाराष्ट्राच्या खेड्यात फिरले व आत्मसाक्षात्काराचा कार्यक्रम केला.

दिवसभर जागृतीच्या कार्यक्रमानंतर नदीवर सर्वजण मीठपाणी (फूटसोक) करीत. चूलीवर जेवण बनवले जात. महाराष्ट्राच्या शांत वातावरणात सामूहिकतेची पिंगळा नाडी थंड होत. भजनांमध्ये रंगून दिवस जादूसारखे जायचे.

साधक श्री माताजींना प्रश्न विचारायचे.

प्रश्न : ध्यान कितीदा करायचे?

उत्तर : प्रत्येक क्षणी.

प्रश्न : आत्मसाक्षातरानंतर आपल्या कर्माचे काय होते?

उत्तर : परमात्म्याशी एकरूप झाल्यावर साधक कर्म विहिन होतो.

प्रश्न : भीती म्हणजे काय?

उत्तर : भीती आपले नुकसान करते, पण सहजयोग केल्यास भीती जाते.

प्रश्न : चित्त कसे कार्य करते?

उत्तर : आत्मसाक्षात्कारानंतर चित्त जागृत होते व ते परम चैतन्याने सर्व कार्य करते.

गावक-यांनी श्री माताजींची मिरवणूक काढली. बैलगाडीला सुंदर सजवून सनई, चौघडे व लेझीमने त्यांचे स्वागत केले. रस्त्यावर दिवे लावले व रांगोळ्या काढल्या. श्री माताजींवर फुलांचा वर्षाव झाला व चोहीकडे जय श्री माताजी ऐकू येत.

फेब्रुवारी १८ ते २८ १९८४ पाश्चात्य योगी दिल्ली येथे गेले. तिथे दहा दिवस खूप प्रचार-प्रसाराचे कार्यक्रम झाले. एफआयसीसीआय सभागृह, कॉन्स्टिट्यूशन क्लब व सनातन धर्म मंदिर येथे श्री माताजींनी तास न् तास उभे राहून प्रत्येक साधकाच्या शंका दूर केल्या.

प्रश्न : तुम्ही कुंडलिनी जागृती कशी केली?

उत्तर : ही एक दैवी परंपरा आहे. मी फक्त ती तुमच्यापर्यंत आणली आहे.

प्रश्न : चैतन्य म्हणजे काय?

उत्तर : चैतन्य आपल्या हृदयात आहे. आत्मा परमात्म्याचा अंश आहे. ब्रह्मरंध्र उघडल्यावर चैतन्य जाणवू लागते.

दिल्लीत सहजयोग वेगाने पसरू लागला. ७८, कृष्णानगर, सफदरजंग हा सहजयोगाचा भारतातला पहिला आश्रम झाला.

२ मार्च १९८२ ला श्री माताजी ऑस्ट्रेलियाला गेल्या. मार्चमध्ये मुंबईला परत येऊन, २३ मार्च रोजी त्या लंडनला गेल्या.

श्री माताजींना फ्रान्सची खूप काळजी होती. ५ मे ला सहस्रार पूजा फ्रान्समध्ये झाली. त्यानंतर पोर्तूगालमध्ये कार्यक्रम झाले.

गुरूपूजेचा लाभ इंग्लिश योग्यांना मिळाला. त्यांना सृष्टीच्या रचनेबद्दल खूप प्रश्न विचारायचे होते. श्री माताजींनी त्यांना `द इटर्नल प्ले` ह्या पुस्तकात सर्व सांगेन असे आश्वासन दिले.

श्री कृष्ण पूजेत श्री माताजी म्हणाल्या, `माझ्या वयाचा काही फरक पडत नाही. मी जी आहे ती आहे.`

२२ ऑगस्ट ला श्री गणेश पूजा जिनिव्हामध्ये झाली. `माझ्या ह्या अवतारात साधकांनी मला ओळखले पाहिजे.`

२६ सप्टेंबरला व्हियेन्नामध्ये दूर्गापूजा झाली. ऑस्ट्रीयामध्ये सहजयोग स्थापित झाला.

लंडनला परत येताच भारताचे राष्ट्रपती श्री.संजीव रेड्डी ह्यांना आशीर्वादित करण्याची विनंती भारताचे राष्ट्रदूत घेऊन आले. श्री.रेड्डी अमेरिकेत हृदय शस्त्रक्रिया (ओपन हार्ट सर्जरी) करून लंडन मार्गे भारतात परत जात होते व त्यांची तब्येत बिघडली. श्री माताजींनी त्यांच्या हृदयाला चैतन्य दिले व श्री.रेड्डींना पहिल्यांदा शांत झोप लागली.

श्री माताजी जेव्हा भारतात परतल्या श्री.रेड्डींनी स्वत: त्यांना राष्ट्रपती भावनात आमंत्रित केले. खास श्री माताजींकरिता चंदनाची खुर्ची तयार करण्यात आली. हारतु-यांनी श्री माताजींचे स्वागत झाले. अत्यंत आदराने श्री.रेड्डी माताजींच्या चरणांजवळ बसले. श्री माताजी म्हणाल्या, `सर, हे काय करताय? तुम्ही भारताचे राष्ट्रपती आहात.` `मी राष्ट्रपती असेन, पण तुम्ही संत आहात.`

# अध्याय दहावा - १९८३

नवीन वर्ष कोल्हापूरला श्री महालक्ष्मी पूजेने साजरे झाले. श्री माताजींनी सांगितले, की महालक्ष्मी ह्या निर्मितीचे मूलतत्त्व आहे.

वैतरणा दौ-याच्या वेळी श्री माताजींना नदीकिनारी एक सुंदर जागा दिसली. ती सहजयोगाकरिता विकत घेण्यास श्री माताजींनी सांगितले.

त्या वर्षी भारत दौ-याची मंडळी वैतरणाला थांबली.

धुळ्याला श्री सरस्वती पूजा झाली. श्री माताजींनी `धूलिया` म्हणजे धूळ असे सांगितले. त्यांनी सात वर्षांच्या असतांना रचलेली कविता आठवली -

आय वाँट टू बी स्मॉलर लाइक डस्ट ...........................

१ फेब्रुवारीपासून दिल्लीला सामूहिक कार्यक्रम सुरू झाले. ९ फेब्रुवारीला जंगपूराच्या कार्यक्रमात श्री माताजींनी सांगितले, की दिल्लीत सहजयोग पसरला, पण दिल्लीच्या लोकांचे हृदय अजून उघडले नाही. ते अजूनही सहजयोगी फक्त उपचारांकरिता करतात. आधात्मिक प्रगतीकरिता नाही. पण आता वेळ आली आहे, की त्यांनी हृदय उघडले पाहिजे.

साधकांना चरणस्पर्श करायचा होता, पण श्री माताजी म्हणाल्या, धरतीमातेला नमस्कार करा. माझे आशीर्वाद मिळतील!

पुढील आठवड्यात होळी आली. श्री माताजींनी पूजा न करता सगळ्यांना रंगपंचमीचा आनंद घेण्यास सांगितले. जणू यमुनाकाठी श्री कृष्णाबरोबर रासलीला खेळण्याचा निरानंद योग्यांना प्राप्त झाला.

श्री माताजींच्या साठाव्या वाढदिवसाच्या समारंभाला डॉ.नागेंद्र सिंग हे मुख्य अतिथी होते. डॉ.सिंग जागतिक न्यायालयात होते. इतक्या उच्च पदावर असूनही ते विनम्र व प्रकाशित (एनलाइटेन्ड)होते. श्री.वेणूगोपलही या कार्यक्रमास हजर होते. आपल्या भाषणात ते म्हणाले, मी श्रीकृष्ण भक्त होतो. पण मला आत्मसाक्षात्कार श्री माताजींनी दिला. श्री माताजी विनम्रतेने म्हणाल्या, `मी जी आहे ती आहे. मी तरूण किंवा वृद्ध होत नाही, मी फक्त आहे.`

दिल्लीत वाढदिवस झाल्यावर मंबईच्या योगीजनांनीपण श्री माताजींचा वाढदिवस थाटात साजरा केला.

# अध्याय अकरा

२८ ऑगस्ट १९८३ ला श्री कृष्ण पूजा जिनिव्हा ला झाली. ह्या पूजेत श्री माताजी म्हणाल्या, विराटांगणेची शक्ती आता कार्यान्वित होत आहे. सहजयोगाचे ज्ञान खूप गहन आहे. आजपर्यंत कोणत्याही संतांनी सांगितल्यापेक्षाही गहन!

सप्टेंबर १९८३ मध्ये अमेरिकेत दोनशे साधकांना जागृती मिळाली. येशूने सांगितलेली `होली घोस्ट` तुम्हीच का? हा प्रश्न साधक विचारीत. थंड चैतन्य लहरी वाहू लागत.

एक बहिरा मुलगा ह्या कार्यक्रमात हजर होता. श्री माताजींनी करंगळी त्याच्या कानात घालताच त्याला ऐकू येऊ लागले. उपस्थित सर्व आश्चर्यचकित झाले.

बॉय स्काऊट कँप, सांताक्रूझमध्ये सेमिनार झाला. तिथे रेडवूड झाडांमध्ये श्री माताजींची केबिन होती. `इथे वैकुंठासारखे चैतन्य आहे.` आज ही जागा कान्हाजौहरी म्हणून ओळखली जाते व अमेरिकेच्या खूप पूजा व सहज कार्यक्रम इथे होतात.

ह्यानंतर सॅन फ्रॅन्सिस्कोमध्ये कार्यक्रम झाले. १९९७ मध्ये सॅन फ्रॅन्सिस्को चे पहिल्या सहज आश्रमाचे उद्‌घाटन श्री माताजींनी केले.

बोस्टन येथील कार्यक्रमात महात्मा गांधींच्या नातवाला जागृती मिळाली.

एकादश रूद्रपूजा न्युयॉर्कमध्ये झाली. पूजेनंतर श्री माताजी कॅनडाला गेल्या.

# अध्याय बारावा

नोव्हेंबर १९८३ मध्ये नी माताजी दिल्लीला परत आल्या. ह्या काळात सहजयोग्यांचे दिल्लीत आश्रमाकरिता जागा शोधण्याचे सर्व प्रयत्न असफल झाले होते. श्री माताजींनी बंधन दिले व श्री.वेणूगोपालला गव्हर्नर नी.जगमोहनला भेटण्यास सांगितले. गव्हर्नर वेणूगोपलला एका जून्या मित्राप्रमाणे भेटले व दिल्लीतील सर्व रिकामे प्लॉट्स दाखवले. कुतूबमधील एक जागा आवडली व एक लाख वीस हजारात हा प्लॉट लाइफ इटर्नल ट्रस्टच्या नावावर झाला. श्री मातीजींनी दिल्लीला दिवाळी पूजेने आशीर्वादित केले.

२३ डिसेंबर ला श्री माताजी नागपूरला आल्या. साळवे चौकात श्री.प्रसादराव साळवे ह्यांचे स्मारक उभारण्यात आले. उद्घाटन भारताचे उपराष्ट्रपती श्री.हिदायतुल्ला ह्यांच्या हस्ते झाले.

ठाण्याचे सहजयोगी श्री.राजेश शाह ह्यांच्या स्टीलच्या कारखान्यात कामगार खूप त्रास देत होते. मजदूर युनियनने संप (स्ट्राईक) केला होता. श्री माताजींनी कारखान्यामध्ये श्री गणेश पूजा करण्यास सांगितले. पूजा करताच सर्वांच्या कुंडलिनी चढल्या व सामूहिकतेची कुंडलिनी कार्यान्वित झाली.

संप मागे घेण्यात आला. राजेश शहांनी कारखान्यामध्ये गणेश मंदीर बांधले. फक्त कारखान्यातच नाही तर ठाण्यात सर्वत्र सहजयोग पसरू लागला. ठाण्याच्या महापौरांनीदेखील सहजयोग स्वीकारला.

# अध्याय तेरावा

१२ फेब्रुवारी १९८४ मध्ये बोर्डीमध्ये अंतरराष्ट्रीय सेमिनार झाला. सुमारे ५००० योगी आले होते. त्यानंतर लग्नाचे आयोजन करण्यात आले. श्री माताजींनी चैतन्यावर जोड्या जुळविल्या. मेंदीच्या कार्यक्रमानंतर श्री माताजींनी मुलींना गृहलक्ष्मी तत्त्वाबद्दल सांगितले व मुलांना त्यांच्या गृहलक्ष्मीचा आदर करण्यास सांगितले.

लग्नानंतर श्री माताजी ब्रह्मपुरीला गेल्या. पांडवांनी ब्रह्मपूरीला श्री महादेवाची पूजा केली होती. कृष्णा नदीत श्री रामदास स्वामींना श्री राम, सीता व आंग्ददेवीची मूर्ती मिळाली होती. श्री माताजींनी कृष्णा नदीला आशीर्वाद दिला. उपस्थित योग्यांनी भजने म्हंटली. चैतन्यात सगळे नाहून निघाले.

२९ फेब्रुवारीला महाशिवरात्री पूजा पंढरपूरला झाली. पंढरपूर हे विराटाचे स्थान आहे.

१२ मार्चपासून एक आठवडा दिल्लीत प्रचार-प्रसारचे कार्यक्रम झाले. मेरठला जेव्हा कार्यक्रम झाले, तिथून खूप थंड चैतन्य वाहू लागले. ह्याचे कारण असे, की श्री माताजी लग्नानंतर पहिली काही वर्षे मेरठला राहिल्या होत्या.

## अध्याय चौदा

मकरसंक्रांती पूजा महाराष्ट्रात १४ जानेवारीला झाली. नासिकमध्ये लग्नांना भेट देण्याकरिता श्री माताजींनी चांदी विकत घेतली. ६ फेब्रुवारीला सहजयोगात लग्ने झाली व `विश्व निर्मल धर्म` ची स्थापना श्री माताजींनी केली.

दिल्लीच्या कार्यक्रमात लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेजचे उपाध्यक्ष डॉ.यू.सी.राय श्री माताजींजवळ आपल्या नातीला बरे करण्याची विनंती घेऊ आले. श्री माताजींनी त्या लहान बाळाची कुंडलिनी चढवली व तिला बरे केले. तीन दिवसात बाळ खेळू लागले. डॉ.रायला खूप आश्चर्य वाले. `आमच्या मेडिकल सायन्समध्ये असे होऊ शकत नाही.`श्री माताजी म्हणाल्या, `विज्ञान एका टप्प्यानंतर मर्यादित होत.` तुम्ही सहजयोगात लोक कसे बरे होतात? ह्यावर संशोधन का करीत नाही?

डॉ.राय व आणखी तीन डॉक्टरांनी स्वत:ला संशोधनात झोकून टाकले. शारीरिक तंदुरुस्ती दमा आणि अपस्मार(एपिलेप्सी) ह्या विषयांचे त्यांनी अभ्यास केला. १९९५ मध्ये मेडिकल सायन्स इनलायटन्ड नावच्या पुस्तकात हे संशोधन छापले. काही वर्षांनी डॉ.राय सहजयोग हेल्थ सेंटर, वाशीचे अध्यक्ष झाले.

जयपूरला कार्यक्रमानंतर दिल्लीत वाढदिवस साजरी झाली. पूजेनंतर श्री माताजी ट्रेनने पठाणकोटला गेल्या. महाजननांच दोनशे वर्षे जून पिढीजात घर श्री माताजींना अर्पण करण्यात आले. त्या घरात सहजयोगाची शाळा सुरू करण्यात आली.

धरमशाळेला पोचून श्री माताजींनी हिमालयाला नमन केले. लायन्स क्लब, धरमशाळाने धोलाधार हॉटेलमध्ये श्री माातजींचा कार्यक्रम आयोजित केला. माताजी तेव्हा महाजनांच्या तलनू येथील घरात रहात होत्या. त्या स्थानी सहजयोगाचे संग्रहालय करण्याची इच्छा श्री माताजींनी व्यक्त केली. आईच्या आशीर्वादाने आज ते घर एक संग्रहालय आहे आणि जगभरातून योगी तिथे येतात.

एक गर्भवती गाय श्री माताजींच्या मागे फिरत. श्री माताजींनी तिला आशीर्वाद दिला व एका तासाने तिला वासरू झाले. त्या वासराचे नाव `धिरा` ठेवले. त्याच रात्री तेथील रखवालदारच्या बायकोला मुलगा झाला. त्याचे नाव `चिरंजीव` ठेवले.

२९ मार्चला पुरुषोत्तम हॉल, तलनू इथे श्री शैलपूत्री पूजा करण्यात आली. शैलपुत्री म्हणजे हिमालयाची मुलगी. पहाडी लोक लांबून ह्या पूजेला आले. त्यांनी पहाडी भजने म्हटली. पहाडी लोकांची अबोधिता व भक्ती पाहून श्री माताजींनी त्यांना अनेक आशीर्वाद दिले. हिमालय एक स्वयंभू स्थान आहे व तो संपूर्ण विश्वात चैतन्य पसरवतो. तलनू हे सहस्रारातील आज्ञा चक्राचा मागचा भाग आहे.

रात्रीच्या जेवणानंतर श्री माताजी खूप गाढ झोपल्या व दुस-या दिवशी संध्याकाळीच उठल्या. वय दहा वर्षे मागे गेल्यासारख्या त्या दिसत होत्या. `माझा इतक्या वर्षाच्या प्रवासाचा थकवा आता गेला. हिमालयातील सर्व संतांनी माझा थकवा ओढून घेतला.`

पूजेनंतर दोन दिवस झाले, तरीही प्रसाद संपत नव्हता असे कळले. `हा अन्नपूर्णेचा आशीर्वाद आहे.`

दल लेकच्या कार्यक्रमात ५००० लोक आली. येथील लोक देवी भक्त आहेत. म्हणून ते मला लगेच ओळखतात. सर्वांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. दल लेकचे नाव आधी दूरर्वेश्वर असे होते. कारण दूर्वास ऋषींनी इथे तप केला होता. ब्रिटीश काळात दूर्वेश्वरचे दल लेक झाले.

तसेच धर्मशाळा आधी `धर्म शिला` होते. कारण दूर्वास ऋषींनी एक शिलेवर बसून ध्यान केले. ब्रिटीशांनी धर्मशिलाचे धर्मशाळा केले.

## अध्याय पंधरा

उत्तरेला आशीर्वादित करून श्री माताजींचे चित्त पूर्वेकडे गेले. कोलकाताच्या योग्यांनी श्री दुर्गा पूजा आयोजित केली.

पूजेनंतर ठेवलेल्या सामूहिक कार्यक्रमाला फक्त दोन लोक आली. सहजयोग्यांना खूप वाईट वाटले. पण श्री माताजी म्हणाल्या, बंगालमध्ये देवीने महिषासूराचा वध केला होता. इथे मला जास्त मेहनत घ्यावी लागणार आहे. त्या दोन साधकांबरोबरसुद्धा श्री माताजी अशा बोलल्या जणू पूर्ण मानवजातीशीच बोलताहेत. आणि दुस-या दिवशीच्या कार्यक्रमाला सभागृह पूर्ण भरून गेले.

इस्टर पूजेकरिता श्री माताजी लंडनला गेल्या, तेव्हा शूडी कँपमधील आश्रमाची स्थापना झाली. लगेचच ऑस्ट्रिया आणि जर्मनीमध्ये कार्यक्रम झाले आणि त्यानंतर मिलान आणि व्हेनिसमध्ये. अमेरिकेत न्यूयॉर्क, लॉस एंजिलिस आणि सॅन दिएगोमध्ये सामूहिक कार्यक्रमांना खूप प्रतिसाद मिळाला नाही. निराश योग्यांना प्रोत्साहन देत श्री माताजी म्हणाल्या, आधी पेरणी करावी लागते, मगच कापणी करता येते.

उन्हाळ्यात श्री माताजी व्यापकतेने यूरोपमध्ये प्रचारास फिरल्या. स्विस योग्यांनी नवरात्री पूजा केलवर श्री माताजी भारतात परतल्या.

कोलकाताला महाकाली पूजेने श्री माताजींनी आशीर्वादित केले. श्री महाकालीची १०८ नावे घेऊन हवन करण्यात आले. ह्याने सामूहिकतेची इडा नाडी शुद्ध झाली.

महाराष्ट्रात परतून श्री माताजींनी श्री.मगदूम ह्यांना गणपतीपुळे येथील गणेश स्वयंभूजवळ जागा विकत घेण्यास सांगितली. ही जागा श्री माताजींनी सहजयोगाला दान केली. पुढे आणखी सहा एकर जागा घेऊन इथे निर्मल नगरी स्थापित करण्यात आली.

## १९८६ **अध्याय सोळा**

श्री गणेश पूजेने नवीन वर्षाची सुरूवात गणपतीपुळेला झाली. भारत दौ-याकरिता आलेले योगी नंतर कोल्हापूरला गेले. सांगलीमध्ये श्री महालक्ष्मी पुजा करण्यात आली. `सुषुम्ना नाडीवर महालक्ष्मी आज्ञा चक्राच्या पुढे विराटांगणा स्वरूप घेते.`

८ जानेवारीला हा दौरा पुढे पुण्यात आला. इथे देवी पुजा झाली. संक्रांतीच्या शुभमुहूर्तावर श्री माताजींनी घेतलेल्या अकरा एकर जमिनीवर बांधकाम सुरू झाले. ही जमीन एनडीए कडे जाणा-या मार्गावर होती. ह्या वास्तुचे नाव `प्रतिष्ठान` ठेवले.

एका वर्षात हे बांधकाम पूर्ण करायचे होते. कारण श्री.श्रीवास्तव सेवानिवृत्त होणार होते. जागेचे बांधकाम बघण्याकरिता कोथरूड येथे श्री माताजींनी दोन बेडरूमचा फ्लॅट भाड्याने घेतला.

प्रतिष्ठानचे काम वेगाने सुरू झाले. खोदणीच्या वेळेस एक मोठा दगड हालतच नव्हता. श्री माताजी म्हणाल्या, `हे स्वयंभू श्री गणेश आहेत.` आजही हा स्वयंभू प्रतिष्ठानच्या हॉलमध्ये आहे. अशी धारणा आहे, की प्रतिष्ठानच्या ह्या जागेमध्ये सीतामाई राहिल्या आहेत. ह्या जागी वाल्मिकी ऋषींचा आश्रम होता. प्रतिष्ठानपासून तीस मैलावर सासवडजवळ वेल्हे गावात वाल्मिकींची समाधी आहे.

प्रतिष्ठानचे काम सुरू असतांना श्री माताजींचे चित्त तेथील कामगारांवर असे. त्यांना झोपडे बांधून दिले. त्यांच्याकरिता स्वच्छ पाणी व सणावारांना श्री माताजी त्यांच्याकरिता नवीन कपडे व लहान मुलांकरिता खेळणी आणत. कोणी आजारी असल्यास त्यांच्यावर सहजयोगातील उपचार करण्यात येई.

पुण्यातील युवाशक्तीने बांधकामास मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांना व्यवस्थित पगार तर मिळालाच पण स्वत: आदिशक्तीने बनवलेले जेवण जेवायचे सौभाग्य पण प्राप्त झाले. सकाळी लवकर उठून श्री माताजी मंडईत जाऊन सर्वोत्तम भाज्या व फळे आणायच्या.

## कृतज्ञता - अध्याय सतरा

मुंबईत एकदा एका काम करणा-या बाईकडून श्री माताजींच्या साडीवर चुकून चहा सांडला. ह्या चुकीने तिला जणू मरणयातना होऊ लागल्या. हे पाहताच श्री माताजींनी तिला समजावले व म्हणाल्या, ही खूप जुनी साडी आहे. वाईट वाटून घेऊ नकोस. ही साडी मी तुलाच देणार होते. कृतज्ञतेने त्या बाईच्या डोळ्यात पाणी आले. श्री माताजींची करूणा अपार आहे.

फेब्रुवारीमध्ये कोलकाता येथे लायन्स क्लबने श्री माताजींचे कार्यक्रम आयोजित केले. क्लबला श्रीमंत व्यापा-यांना प्रभावित करायचे होते. `देवाला पैसे समजत नाही. साधकाला पैशात मोजता येत नाही. सहजयोग पैशाने चालत नाही. पैशाने कुंडलिनी जागृती शक्य नाही.`

कोलकाताच्या सफारी पार्क लॉन्समध्ये लोक खच्चून भरले होते. मागच्यावेळेपेक्षा आता साधकांची संख्या खूप वाढली होती. हे पाहून सहजयोग्यांना आनंद झाला.

नंतर दिल्लीत कार्यक्रम झाले. २४ फेब्रुवारीला दिल्ली विद्यापिठाच्या विद्यार्थी संघटनेने श्री माताजींना त्यांच्या `हार्मोनी 86` ह्या कार्यक्रमाकरिता आमंत्रण दिले. कॅबिनेट मंत्री श्री.गुलामनबी आझाददेखील उपस्थित होते. ह्या वेळेस श्री माताजींनी अंतरराष्ट्रीय सहज विद्यार्थी संघाची स्थापना केली.

# अध्याय अठरा

मार्चमध्ये वाढदिवसानंतर श्री माताजी इंग्लंडला गेल्या.

मेडीसियो, इटलीला सहस्रार पुजा साजरी झाली. मनुष्य आळशीपणामुळे सहजयोग पूर्णपणे प्राप्त करू शकत नाही. आपण काय करतोय ह्याची जाणीव आपल्याला सतत पाहिजे. सहजयोग हृदयापासून केला पाहिजे.

फ्रान्सला देवी पूजेनंतर श्री गणेश पुजा मॅड्रिडला झाली. ऑस्ट्रिया आणि स्वित्झर्लंडनंतर अमेरिकेत खूप कार्यक्रम झाले. न्यूयॉर्क, सॅन दिएगो, लॉस एंजिलिसमध्ये सहजयोग पसरू लागला. सॅन दिएगोमध्ये श्री गणेश पूजेनंतर अमेरिकेचे गणेश तत्त्व जागृत झाले. अमेरिकेनंतर हॉलंड आणि बेल्जियममध्ये श्री माताजी गेल्या. जगातील सर्व देश एकमेकांवर परस्परावलंबी आहेत. ही विराटाची लीलाच होय. बेल्जियम शांतीचे प्रतिक आहे आणि हॉलंड न्यायाचे. जिथे न्याय नाही, तिथे शांती स्थापित होऊ शकणार नाही.

एका डच योगिनीने विचारले, इतक्या नकारात्मक शक्त्या असूनही हॉलंड अजून समुद्रात बुडले कसे नाही? कारण हॉलंडमध्ये आदिशक्ती करिता फुले उगतात. आदिशक्तीला फुले प्रिय आहेत.

९ ऑक्टोबरला श्री माताजी कोलकाताला नवरात्री पूजेकरिता आल्या. मागील एक आठवड्यापासून कोलकात्यात मुसळधार पाऊस पडत होता. आयोजकांना कार्यक्रम कसा होणार ह्याचा प्रश्न पडला. परंतु श्री माताजींचे विमान कोलकाता येथे येताच ढग गेले व सूर्यदेवांनी दर्शन दिले. पूजेत श्री माताजींनी सांगितले, की बंगालमध्ये खूप तांत्रिक विद्या असल्याने इथे दारिद्र्य आहे. सहजयोग हे सर्व समस्यांचे एकच समाधान आहे.

डॉ.यू.सी.राय हे वैद्यकिय जगात सहजयोग आणण्याकरिता उत्सुक होते. त्यांनी वैद्यकिय परिषदेचे आयोजन केले. मंत्रमुग्ध होऊन सर्व डॉक्टर्स लोकांनी श्री माताजींचे भाषण ऐकले.

विनायक चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर प्रतिष्ठान पूर्ण झाले. सनई-चौघड्याच्या मधूर संगीतात श्री माताजींचे स्वागत झाले. पूर्ण प्रतिष्ठान रांगोळ्या, फुले व दिव्यांनी सजविले होते. श्री माताजींनी स्वत: संगमरवराची गणपती मूर्ती प्रतिष्ठानच्या उंबरठ्याजवळ स्थापित केली.

संध्याकाळी प्रतिष्ठानात जणू सोहळाच संपन्न होत होता. हैद्राबादचे प्रसिद्ध सुफी गायक बाबा जहीर यांनी आपल्या गाण्यांनी संध्याकाळ रंगवली.

कार्यक्रमानंतर श्री माताजींनी कलाकार व प्रेक्षक सर्वांवर भेटवस्तुंचा वर्षाव केला. त्यानंतर दणदणीत जेवणाची मेजवानी बागेत तयारच होती. संध्याकाळची समाप्ती फटाक्यांच्या आतिषबाजीने झाली.

# अध्याय एकोणीस

जानेवारी १९८७ मध्ये प्रतिष्ठानचे पहिले पाहूणे आले.... ३०० योगी! प्रतिष्ठानच्या बागेत त्यांचे स्वागत झाले.

श्री माताजींना बागकामाची खूप आवड होती. जगातील वेगवेगळ्या प्रकारची फुले प्रतिष्ठानच्या बागेत होती. इंग्लंडचे गुलाब, हॉलंडचे ट्यूलिप, थायलंडचे ऑर्किड इत्यादी. `मला अजून झाडे लावायची आहेत, पण पाणी पुरेसे नाही.` कृषी विद्यापीठाच्या प्राध्यापकाने पावसाच्या पाण्याच्या साठवणूकीची सूचना केली. ह्या करिता एक छोटेसे धरण प्रतिष्ठानच्या मागे बांधलेदेखील गेले.

द्राक्षाचा मोठा घड बघून श्री माताजी म्हणाल्या, `द्राक्षे मला माझ्या आईची आठवण करून देतात. जोपर्यंत माझा देश स्वतंत्र होत नाही आणि द्राक्ष सामान्य माणसाला उपलब्ध होत नाही तोपर्यंत मी द्राक्षे खाणार नाही.` आज महाराष्ट्रात द्राक्षाची मोठ्या प्रमाणावर लागवड होते आणि सर्वजण त्याचा आस्वाद घेऊ शकतात ह्याचा मला आनंद आहे.

एक सुरम्य सकाळ प्रतिष्ठानातील भाज्या तोडण्यात गेली. सूर्यफुलाकडे पहात श्री माताजी म्हणाल्या, `चैतन्य लहरींमुळे (व्हायब्रेशन्स) ही सूर्यफुले इतकी मोठी झाली. चैतन्यित बियाणांनी उत्पादन वाढू शकते. मी १७०० किलो बासमती तांदूळ फक्त ६० किलो चैतन्यित बियांनी उत्पादित केला.

श्री अन्नपूर्णा देवीचा आशीर्वाद सदैव असे. ह्या ३०० योग्यांना पास्ता खायचा होता. पण पास्त्याची फक्त १० पाकिटे होती. श्री अन्नपूर्णेच्या कृपेत पास्ता कमी पडला नाही. ३०० लोकांनी पोटभर पास्ता खाल्ला. जेवण जरी दहा लोकांकरिता बनवले आणि शंभर लोक जरी जेवले तरीही जेवण कधीच कमी पडले नाही.

श्री माताजी हस्तकलेला प्रोत्साहन देत. हस्तकलेत चैतन्य असते. त्याने तुमच्या घराच्या चैतन्य लहरी तर सुधारतील पण कारागिरांनादेखील रोजगार मिळेल. जगात श्री माताजी जिथे कुठे असतील तिकडच्या हस्तकलेच्या वस्तु त्या नेहमी विकत घेत. सहजयोग्यांनी दिलेल्या हस्तकलेच्या वस्तुंकरिता त्यांनी प्रतिष्ठानमध्ये खास काचेचे कपाट बनवले. चीनमधील भरतकाम, युक्रेनमधील टेराकोटा, यूरोपचे पोर्सेलिन आजही प्रतिष्ठानमध्ये बघायला मिळते.

# अध्याय वीस

११ जानेवारीला श्री माताजींनी पैठणला (पूर्वीचे प्रतिष्ठान)पूजेने आशीर्वादित केले. पैठण हे त्यांचे पूर्वज शालिवाहन राजांची राजधानी होते. शालिवाहन राजांनी पैठणवर ४०० वर्षे राज्य केले. २०३ ई.स.पूर्व ते २३० ए.डी. ह्या क्षेत्राकरिता हा काळ रामराज्य होता. जेव्हा ईसा काश्मिर येथे आले तेव्हा शालिवाहन राजाला त्यांनी सांगितले, की मी `म्लेच्छ' देशातून आलो आहे.

पैठणमध्ये पारंपारिक नऊवार पैठणी साडी श्री माताजींना भेट दिली गेली.

औरंगाबादच्या दुपारच्या तळपत्या उन्हात बाहेर जाऊ नका असे श्री माताजींनी पाश्चात्य योग्यांना सांगितले होते. पण त्यांनी ऐकले नाही. ते परत आले, तर ते उन्हामुळे होरपळून गेले होते (सन बर्न). स्वत:ची साडी त्यांच्यावर टाकून श्री माताजींनी त्यांची उष्णता काढून टाकली. साडीला मात्र छिद्रं पडली.

औरंगाबादमध्ये श्री माताजी आपल्या भावाकडे, न्यायमूर्ती साळवे (ज्यांना प्रेमाने बाबा मामा म्हणत) यांच्याकडे राहिल्या. त्यांनी न्यायालयातील आपल्या वकिल मित्रांना व न्यायाधिशांना जागृतीसाठी घरी आमंत्रित केले. त्यांच्या शुद्ध बुद्धिमुळे त्यांना लगेच आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. सामूहिकतेचा दोषभाव श्री माताजींच्या कृपेत शुद्ध झाला.

१४ तारखेला संक्रांती पूजा राहुरीला झाली. पहाटे तीन वाजेपर्यंत योग्यांनी मराठी, हिंदी, संस्कृत, इटालियन आणि इंग्लिश भजने म्हटली.

संध्याकाळी श्री माताजी कृषी विद्यापिठाच्या प्राध्यापकांना भेटल्या. विनासंकरित बियांना चैतन्यित करून उत्पादन वाढू शकते. ह्या संशोधनाकरिता विद्यापिठाच्या कुलगुरूंनी देणगीदेखील दिली.

दुस-या दिवशी श्री माताजींनी आपल्या पूर्वजांच्या वाड्याला भेट दिली. हा वाडा नांदगाव शिंगवे गावाजवळ आहे.

त्या वेळेची गोष्ट सांगतांना श्री माताजी म्हणाल्या, `माझ्या आजोबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सर्व मुलांना मारण्याचा कट रचला गेला. तेव्हा रात्रीच्या अंधारात त्यांच्या आजीने सर्व मुलांना घेऊन नांदगाव नदी पोहून सर्वांचा जीव वाचवला.

श्री माताजींचा परिवार ख्रिश्चन कसा झाला हे सांगताना त्या म्हणाल्या, `माझ्या आजोबांची बहिण वयाच्या विसाव्या वर्षी विधवा झाली. तिचा पूनर्विवाह कर्मठ हिंदू समुदायामध्ये झाला नसता म्हणून त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला.`

एका स्थानिय राजनेत्याने श्री माताजींच्या पूर्वजांची हडप केलेली दोन एकर जागा परत देण्याचे कबुल केले. योग्यांनी श्री माताजींना त्या माणसापासून सावध राहण्यास सुचविले. आपल्या दैवी शक्त्यांनी श्री माताजींनी पाहिले, की तो माणूस ज्या बाईबरोबर रहात होता, ती दुस-या कोणाची तरी बायको होती. सर्व योगीजन आश्चर्यचकित झाले. हे सर्व सत्य असल्याचे कळल्यावर श्री माताजी म्हणाल्या, `चैतन्य लहरींनी तुम्ही कोणालाही ओळखू शकता. जेव्हा मी कोणाला पाहते, मी त्या माणसाची कुंडलिनी पाहते. हजारो सहजयोग्यांमधूनदेखील मी ओळखू शकते, की कोणाची कुंडलिनी कोणती आहे. कारण मी सर्वांवर प्रेम करते.`

जरी त्या भूत, वर्तमान, भविष्य सर्व पाहू शकायच्या तरी त्या कधीही आपल्या शक्त्या दाखवत नसत. सामान्य माणसाबरोबर त्या मिसळून जात. हीच आदिशक्तीची महामाया होती.

`नेती, नेती, नेती (न इति)` हा मंत्र हृदयांतर झाला.

# अध्याय एकवीस

२६ फेब्रुवारीला महाशिवरात्री पूजा मुंबईला झाली.

`ब्रह्मचैतन्य म्हणजे आदिशक्ती आणि सदाशिव, पण माझ्या ह्रदयात आहेत. पण मी मानवी अवतार असल्याने हे कळू शकत नाही. सर्व अवतारांचा माझ्यात समावेश आहे. हे आधुनिक माणसाला समजणे कठीण आहे.`

जेव्हा प्रतिष्ठानला श्री माताजी परतल्या, बगिचा पूर्ण बहरला होता. त्यांना पाहून फूलं आणखीनच खुली. धुळवडीच्या पवित्र रंगाने श्री माताजींची चरण पूजा जाली. पूजेनंतर पाय सरकवल्यावर गवतात श्री गणेशांचे चित्र तयार झाले होते.

श्री माताजींचे चित्त नेपाळवर होते. नेपाळमध्ये तांत्रिक विद्या असल्याने इथे दारिद्र्य आहे. नेपाळचे लक्ष्मी तत्त्व स्थापित करण्याकरिता तिथे श्री लक्ष्मी पूजा करण्यात आली. ह्या वेळेआधी भारत आणि नेपाळच्या संबंधात तणाव होता. भारताने नेपाळची साखर, मीठ, पेट्रोल बंद केले होते आणि उत्तरार्थ नेपाळ राज्याने भारताच्या सर्व कार्यक्रमांवर बंदी आणली होती. म्हणून लक्ष्मी पूजादेखील आश्रमाच्या बागेतच करावी लागली होती.

`माणसाचे मन समस्या तयार करते. सहस्रसारात फक्त समस्यांचे समाधान असते.`

आश्रमाच्या बागेत १५०० लोकांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला.

महालक्ष्मीच्या आशीर्वादाने भारत व नेपाचे संबंध सुधारले आणि नेपाळच्या अर्थव्यवस्थेत प्रगती होऊ लागली.

श्री माताजीचा ६४ वा वाढदिवस षण्मुखानंद हॉल, मुंबई येथे साजरा झाला. भारतीय शास्त्रीय संगीतची राणी परवीन सुलताना ह्यांनी सर्वांना त्यांच्या गाण्याने मंत्रमुग्ध केले. सिनेमाच्या गाण्यांची विनंती येताच, त्या म्हणाल्या, `आपल्या समक्ष कोण बसले आहे तुम्हाला माहीत नाही का?`

जागृती मिळायच्या आधीदेखील त्यांनी श्री माताजींना ओळखले. ज्याप्रमाणे समुद्राला चंद्राच्या कलेची जाणीव होते, त्याचप्रकारे साधक देखील दैवी शक्तीला ओळखतो. काही न करताच साधकांची कुंडलिनी श्री माताजींचे दैवी स्वरूप ओळखते. श्री माताजींच्या सानिध्यात साधकाला विलक्षण शांतीचा अनुभव होतो.

२५ तारखेला प्रतिष्ठानमध्ये परत येताच दरवाज्यावर डेमॉलिशनची शो कॉज नोटीस लावलेली होती. हा पुण्याच्या बिल्डर व राजकारणी लोकांनी रचलेला कट होता. त्यांना प्रतिष्ठान व त्याच्या आजूबाजूची जमीन लास वेगासारखे कॅसिनो शहर उघडण्याकरिता पाहिजे होती. म्हणून ती जागा कृषीकरिता उपयुक्त नाही व प्रतिष्ठानमध्ये व्यवसायासंबंधी कार्य होते असा दावा कोर्टामध्ये केला.

ह्याचबरोबर सकाळ वृत्तपत्राने श्री माताजींचे नाव खराब करायचा प्रयत्न केला. लाइफ इटर्नल ट्रस्टच्या पैशाच्या व्यवहारावर सकाळने प्रश्न केला. पण सर्व पैसे सर सी.पीं.च्या फॉरेन पोस्टिंग व १७ वर्षे यू.एन.मध्ये काम केल्याची कमाई आहे हे स्पष्ट झाले.

ह्या सगळ्या घडामोडींकडे लक्ष न देता श्री माताजींनी आपल्या वकिलाला सांगून स्वत: ऑस्ट्रेलिया व न्यूझिलंडच्या दौ-यावर गेल्या.

७ मे ला प्रतिष्ठानवर डिमॉलिशन ऑर्डर आली.

न्यूझिलंडहून परत येताच श्री माताजींनी मुंबई उच्च न्यायालयाची याचिका स्वत: बनवली. त्यांचा वकील भाऊ आश्चर्यचकित झाला.

28 मे ला न्यायलायाचा निर्णय श्री माताजींच्या बाजूने लागला. श्री माताजी तेव्हा आराम करीत होत्या. झोपून उठताच त्या हसत म्हणाल्या, `काम झाले!` त्यांचा भाऊ सांगत होता, की `हे सर्व एक लिला आहे. परम चैतन्य सर्व कार्य करते.`

# अध्याय बावीस

इंग्लंडमध्ये गुरूपुजेनंतर श्री माताजी अमेरिकेला गेल्या. तिथे श्री विष्णूमाया पूजा झाली. `आत्मसाक्षात्कारानंतर तुमच्या डोळ्यात चमक येते. ही चमक विष्णूमायेची आहे.` पूजेनंतर खूप साधकांना जागृती मिळाली, पण त्यांचे मुलाधार शुद्ध नसल्याने श्री माताजींना त्यांच्यावर खूप मेहनत करावी लागली.

लंडनहून परत येऊन श्री माताजी यूरोपच्या दौ-यावर गेल्या. श्री कृष्ण पूजा पॅरिसला झाली. उस्ताद बिसमिल्ला खान साहेबांचे शहनाई वादनाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. `तुमचे शहनाई वादन मंगलता पसरविते.`

४ ऑक्टोबरला श्री राम पूजा स्वित्झर्लंडमध्ये झाली. `निश्चय करा की सहजयोगात आपण रामराज्य स्थापित करू. परोपकारी, प्रेमळ, शांतीप्रिय, आनंदी, निर्भयता, अनुकंपा, मर्यादाशीलता हे सगळे श्री रामांचे गुण आपल्यामध्ये आले पाहिजेत.`

१० ऑक्टोबरला श्री महालक्ष्मी पूजा बेल्जियमला व १८ ऑक्टोबरला श्री महाकाली पूजा जर्मनीमध्ये झाली. इटलीला दिवाळी पूजेचे सौभाग्य प्राप्त झाले. यूरोप पूर्णपणे चैतन्यमय झाले.

डिसेंबरमध्ये समारंभाकरिता अलिबाग सज्ज झाले. श्री आदिशक्ती तिथे आल्या होत्या व त्यांच्या बरोबर ३०० योगीजन पूजा व सांस्कृतिक कार्यक्रमाने आशीर्वादित झाले.

नंतर औरंगाबाद व अहमदनगरला कार्यक्रम झाले. राहुरीच्या पूजेत कृषी विद्यापीठाला विशेष आशीर्वाद मिळाला.

खिसमस पूजा पुण्यात भुगावच्या तलावाजवळ झाली. ही जागा नंतर सहजयोगच्या ट्रस्टने विकत घेतली.

नवीन वर्ष व सहजयोगातील लग्ने गणपतीपुळ्याच्या समुद्राकाठी साजरे झाले.

सर्वांवर श्री माताजींनी उपहारांचा वर्षाव केला. लहान मुलांकरिता स्टेशनरी व खेळणी. २१ वर्ष वयोगटातील मुलांना शर्ट, टाय व मुलींना बांगड्या व गळ्यातले, तिशीतील लोकांना घड्याळे, चाळीस वर्षे असलेल्यांना चहाचे सेट, भांडी व इतर काही जगभरातून आणलेल्या ह्या सर्व वस्तुंचा प्रेमवर्षाव श्री आदिशक्तींनी केला.

५ तास होऊन गेले, पण भेट देणे संपले नाही. `मी थकत नाही. जिथे प्रेम असते तिथे शक्ती पण असते.`

१९८८

१० जानेवारीला मुंबईला महासंक्रांती पूजेचे सौभाग्य मिळाले. `मी प्रत्येकाला त्याच्या सुषुम्नेवरून ओळखते. नियमित ध्यानाने सुषुम्ना जागृत होते.`

प्रतिष्ठानला परत आल्यावर श्री माताजींनी पुण्यापासून तीस कि.मी.वर शेरे गावात पस्तीस एकर जमीन विकत घेतली. तिते त्यांनी शेतक-यांना चैतन्यित बिया वापरून उत्पादन कसे वाढवायचे व रासायनिक खते न वापरता सेंद्रिय खत वापरण्याचा सल्ला दिला. रासायनिक खताने जमिनीची उष्णता वाढते व ते महागदेखील असतात.

सामूहिक कार्यक्रम व कृषी संशोधनाच्यामध्ये वेळ काढून त्या आजारी माणसांना बरे करीत. कोलकाताचे डॉ.खान यांना तर मृत घोषित केले होते. श्री माताजींनी फोन त्यांच्या कानाशी लावून एक मंत्र खूप वेळा म्हटला. दहा मिनिटात डॉ.खान यांची नाडी परत सुरू झाली व तासाभरात ते हॉस्पिटलच्या बाहेर चालत गेले. हा चमत्कार व मंत्राची शक्ती होय.

प्रतिष्ठान पूर्ण होताच दिल्लीच्या आश्रमाचे बांधकाम सुरू झाले. कोणताही प्रकल्प सहजयोग्याच्या उत्थानाचा मार्ग होत.

आदिशक्तीचे कार्य आत्मा आणि बुद्धीचे एकीकरण करणे होते.

फेब्रुवारीमध्ये श्री मूर्ती, ज्यांना श्री माताजींनी बरे केले होते, कोईम्बतूर, चेन्नई आणि बेंगलोरमध्ये सामूहिक कार्यक्रम आयोजित केले. इडा नाडीच्या उष्णतेमुळे साधकांची कुंडलिनी चढणे कठीण होते. `मला इथे परत यावे लागणार आहे.`

श्री माताजींच्या ६५ व्या वाढदिवसाला सहजयोग विमेन वेल्फेअर सोसायटीची स्थापना झाली. ऑस्ट्रेलियाच्या हाय कमिशनने ह्या प्रकल्पांना राशी दिली. श्री.पुरूषोत्तम जलोटा, श्री.अनुप जलोटा ह्यांचे वडील, ह्यांनी श्री माताजींचा सत्कार केला. संगीतकार मंडळी श्री माताजींना पटकन ओळखतात. कारण आपल्या संगीताद्वारे ते परमात्म्याचे कार्य करीत असतात. उस्ताद अमजदखान, उस्ताद बिस्मिल्ला खान, भजन सोपोरी, अनुप जलोटा, देबू चौधरी, उस्ताद सफद हुसैन, पं.जसराज, पं.भिमसेन जोशी, परविन सुलताना, श्रीमती रजम व इतर संगीतकारांना श्री माताजींचे आशीर्वाद मिळाले आहेत व ते आज लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. `सामूहिकतेत वैयक्तिकता आवश्यक आहे आणि एक व्यक्ति सामूहिकतेशिवाय काही प्राप्त करू शकत नाही. सामूहिकता आणि वैयक्तिकता यामध्ये संतूलन पाहिजे. सहजयोग शांती आणि मांगल्य स्थापित करू शकत.`

लंडनमध्ये इस्टर पूजा व रोममध्ये सहस्रार पूजा साजरी झाली. व्हिएन्नात एकादश रूद्र पूजा झाली. श्री माताजींनी सर्वांचे एकादश रूद्र जागृत केले. त्याने स्वत:च्या व जगाच्या नकारात्मक शक्तीचा नाश करता आला. जर्मनीमध्ये हंस चक्र पूजा झाली. `आत्म्याचे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे असे कोलंबियाच्या पूजेत सांगितले.

नंतर अमेरिकेचा दौरा सुरू झाला. सॅन दिएगोमध्ये श्री बुद्ध पूजा संपन्न झाली. श्री बुद्ध पूजेत व नंतर गुरूपूजेत चमत्कार फोटो (मिरॅकल फोटो) आले. कॅमे-यामध्ये सहस्राराच्या चैतन्य लहरींचे फोटो घेतले गेले.

श्री कृष्णपूजेत देखील `अद्भूत फोटो` (मिरॅकल फोटो) आहेत. `परम चैतन्य माझे दैवी स्वरूप दाखवित आहे.` स्वित्झर्लंडमध्ये श्री फातिमा पूजा झाली. गृहलक्ष्मी तत्त्व माणसाच्या मनातील द्वेष समाप्त करीत.`

१९८८ चे नवरात्र प्रतिष्ठानमध्ये साजरे करण्यात आले. पहिल्या रात्री श्री गणेश पूजेने नवरात्रीची सुरूवात झाली. दुस-या रात्री श्री देवी सुक्त म्हटले. तिस-या व चौथ्या रात्री देवीचे कवच भक्तांना मिळो ही प्रार्थना झाली. `देवीच्या अनेक शक्त्या आहेत. परंतु तुम्ही पहिले देवीला शरण यायला पाहिजे. बंधन घेणे हे तुमचे कवच आहे. घराबाहेर जातांना, प्रवास करतांना, झोपायच्या आधी बंधन घेतले पाहिजे. पण मी स्वत: बंधन घेत नाही. कारण मला सहजयोग्यांच्या बाधा ओढून घ्यायच्या आहेत. ह्याचा मला थोडाफार त्रास देखील होतो. मी तो साक्षीभावाने पाहते. सहाव्या रात्री आदिशक्तीने तिच्या मुलांना आज्ञा चक्राच्या पलीकडे सहस्रारात नेले. सामूहिकतेची निर्विचार स्थिती स्थापित झाली. आईची अनुकंपा आणि प्रेम इतके आहे, की फक्त साधकच नाही तर राक्षसदेखील त्यात नाहून निघतात. ह्यालाच तर देवी महात्म्यामध्ये सांद्र करूणा म्हटले आहे.

सातव्या रात्री अथर्ववेदातील श्री देवी अथर्वशिर्षचे पाठ झाले. श्री माताजींनी बिजमंत्राची माहिती दिली. साक्षात्कारी साधकाने बिज मंत्र म्हटल्यास चक्रांच्या गाठी उघडतात. वेदांमध्ये आदिशक्तीला `इ` असे म्हटले आहे.

आठवी रात्र विशेष होती. श्री माताजींनी ब्रह्मांडाच्या रचनेची माहिती दिली. श्री माताजींनी सर्वांच्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि म्हणाल्या, आत्म्याची तहान भक्तीने भागते. भक्ताने महालक्ष्मी स्तोत्र म्हटले.

नवव्या रात्री भजन, मंत्र आणि प्रार्थना झाल्या. नकारात्मकतेचा पुतळा जाळून दसरा साजरा झाला.

डिसेंबर मध्ये भारत दौ-याची सुरुवात पुण्यापासून झाली. पाश्चात्य योग्यांनी मराठी भजने म्हणून सर्वांची मने जिंकली. सांगलीला कार्यक्रम झाला. योगीजन कृष्णा नदीच्या काठी राहिले होते. उघड्यावर गरम पाण्याने आंघोळ करून सर्वांना सर्दी झाली. श्री माताजींच्या करुणामयी बंधनानंतर त्यांना बरे वाटले. `तुम्ही माझ्या अंगाचे अणू-रेणू आहात. तुमच्या शरीराची काळजी घ्या.`

गणपतीपुळेचा समुद्र बघताच सर्वांमध्ये नवा उत्साह संचारला. जणू आपण आपल्या घरीच आलो आहोत. ख्रिसमस पूजा व सहजयोग विवाह कार्यक्रम खूप थाटात व आनंदात झाले

# १९८९ अध्याय तेवीस

१९८९ ची सुरुवात गुजरात दौ-याने झाली. बडोदा, अहमदाबाद आणि राजकोट. गुजराती लोकांनी पैशाचा मोह सोडला पाहिजे. त्यांची नाभी पडते आहे. अहमदाबाद ते राजकोट ह्या तीन तासाच्या प्रवासात पूर्ण वेळ एक हात खिडकीच्या बाहेर व दुसरा आपल्या नाभीवर ठेवून त्यांनी गुजरातचे नाभी चक्र शुद्ध केले.

चोखड येथील श्री.राजेश शह ह्यांच्या पूर्वजांच्या घरात श्री माताजी पारंपारिक गुजराती पोषाखात सजल्या. गावक-यांनी गुलाबाच्या पाकळ्यांचा वर्षाव केला, केळीच्या पानावर चरणाभिषेक केला व सुंदर सजवलेल्या बैलगाडीत श्री माताजींना कार्यक्रमाच्या स्थळी घेऊन गेले. संध्याकाळी एका कर्करोग्याला श्री माताजींनी बरे केले. थोड्याच वेळात तो सर्वांबरोबर दांडिया खेळू लागला.

पुण्याहून हैद्राबादला जातांना विमान तीन तास उशीरा होते. वेळेकडे लक्ष न देता त्या पुण्याच्या विमानतळावर आलेल्या योग्यांशी गप्पा मारत होत्या. तिथे हैद्राबादला योगीजन श्री माताजींची वाट पहात होते. तीन तास वाट पाहूनही सर्वजण फुलांसारखे टवटवीत दिसत होते. तीन तास ते भजन म्हणत बसले होते. `आम्ही भजन म्हणत होतो आणि आम्हाला पूजेचा आनंद मिळाला.` `माझे चित्त सतत तुमच्यावर होते. तीन तास तुम्ही माझी वाट पहाताय ह्या विचारात मी होते.`

हैद्राबादमध्ये आत्मसाक्षात्कार देणे सोपे होते. कारण तिकडचे एक संत वीरा ब्रह्मेंद्र स्वामी ह्यांनी श्री माताजींचे अवतार कार्य वर्तवले होते.

पण चेन्नईमध्ये स्थिती अजूनही सुधारली नव्हती. त्यांची इडा नाडी जागृत नव्हती. ह्या करिता श्री चित्तशक्ती पूजा केली गेली. कारण चित्त स्थिर असेल तरच इडा नाडी जागृत होऊ शकते.

बेंगलोरलाही हेच दृश्य होते. आधुनिक काळात राक्षस मानवाच्या बुद्धीत शिरले होते. तिकडचे गणेश तत्त्व जागृत करण्याची गरज होती. श्री गणेश पूजेनंतर सामूहिक कार्यक्रमांना लोक भरभरून येऊ लागली.

तीन मार्चला श्री माताजी नागपूरला गेल्या. `माझ्या नातेवाईकांबरोबर व लहानपणीच्या मित्रांबरोबर असे वाटले की जणू मी माहेरीच आलेली आहे.`

त्यांनी योग्यांना आपल्या बालपणाच्या गोष्टी सांगितल्या. छिंदवाड्याच्या आपल्या वडिलांच्या घराची चौकशी बाबा मामांकडे केली. `त्या घरात आता एक डॉक्टर आपला दवाखाना चालवित आहे.` `ते घर आपण परत विकत घेतले पाहिजे.`

ह्याच वेळेस नकारात्मक शक्तींनी डोके वर काढायचे प्रयत्न केले. अंधश्रद्धा निर्मूलन गटाने सहजयोगाचे कार्यक्रम अंधश्रद्धेला प्रोत्साहन देतात हा दावा केला. `परंतु सहजयोग ह्याच्या अगदी विरूद्ध आहे. सहजयोग जागृत श्रद्धा आहे.` श्री माताजींनी पोलीस कमिशनरला स्वत: ह्याचा अनुभव घेण्यास सांगितले. त्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला व हातातून थंड चैतन्य लहरी वाहू लागल्या. कमिशनरद्वारे अंधश्रद्धावाल्यांची कार्यक्रमातून हकालपट्टी झाली.

संध्याकाळी भजनांचा कार्यक्रम रंगला.

श्री माताजींच्या रात्रीच्या जेवणात व्यत्यय आले. कोणाला तरी अर्धांगवायू (पॅरॅलिसिस) झाला होता. `त्याची डावी विशुद्धी पकडते आहे. तो खोटे बोलत असेल, म्हणून पॅरॅलिसिस झाला.` परंतु आपल्या करूणेत श्री माताजींची बंधन दिले आणि काही दिवसात तो माणूस ठीक झाला.

नागपूरहून श्री माताजी आणि सर्व योगी छिंदवाडा पाहायला गेले. श्री माताजींच्या वडिलांचे घर पाहिले. एका लहानशा खोलीतून खूप चैतन्य येत होते. श्री माताजी हसत म्हणाल्या, `ह्या खोलीत माझा जन्म झाला होता.`

पुढचा दौरा दिल्लीचा होता. दिल्ली, नोएडा व प्रितमपूराला सतत दहा दिवस सामूहिक कार्यक्रम झाले. कुतुबचे आश्रम पूर्ण झाले व त्याचा कार्यभार सांभाळण्याचे काम श्री माताजींनी श्री.वेणूगोपालला दिले. श्री.वेणूगोपालनी श्री माताजींनी आश्रमातच रहावे अशी विनंती केली. त्यावर त्यांनी सांगितले की, `एका अटीवर, की मी ह्याचे भाडे देईन.` वेणूगोपालच्या डोळ्यात अश्रू आले. ते म्हणाले की, `तुम्हीच ही जागा विकत घेतली. तुम्हीच बांधकामाचे पैसे दिले व आता तुम्हीच ह्याचे भाडे भरणार!' त्यांनी खूपच विनंती केल्यावर श्री माताजींनी वरच्या मजल्यावर एका छोट्या खोलीत राहण्यास होकार दिला. श्री माताजी तिथे राहिल्याबद्दल श्री.श्रीवास्तव साहेबांनी सहजयोगाला मोठी देणगी दिली, जी भाड्याच्या रकमेपेक्षा खूप जास्त होती.

१९८२ मध्ये नोएडामध्ये श्री माताजींनी एक जागा घेतली होती व ती जमीन रिकामी होती. आता त्या जागेचे बांधकाम सुरू झाले.

डेहराडूनमधील कार्यक्रमानंतर ६६ वा वाढदिवस दिल्ली येथे साजरा करण्यात आला. श्रीमती किर्ती शिलेदार यांनी ह्या कार्यक्रमात नाट्यसंगीत प्रस्तुत केले. सभागृहामध्ये फुलांची सजावट पाहून श्री माताजी प्रसन्न झाल्या. `माझी मुलं (सहजयोगी) सुद्धा अशीच सुंदर फुलं होती. आता ती परिपक्व फळे झाली आहेत. ह्याचा मला आनंद आहे.`

वाढदिवस सोहळ्यानंतर श्री माताजी कोलकाता येथे गेल्या. विमानात पार्श्वगायक श्री.रविंद्र जैन यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. कोलकाता येथे पोहोचताच त्यांनी श्री माताजींना त्यांची व्हॅनिटी बॅग पकडू देण्याची विनंती केली. `एका पुरूषाला मी बाईची बॅग कशी देणार?` `मी आंधळा आहे म्हणून मला हे सौभाग्य प्राप्त नाही होऊ शकत का?` त्यांना नाराज न करता श्री माताजींनी आपली बॅग त्यांना दिली.

श्री.रविंद्र जैन ह्यांनी `विश्व वंदिता` हे भजन लिहिले. श्री माताजींनी त्यात काही बदल केले. इस्टर पूजेपासून आरतीच्या आधी म्हणायला सांगितले.

कोलकाता हे कलेचे माहेरघर. इथे गायक, संगीतकार, कवी, लेखक सर्वांना आदिशक्तीचे आशीर्वाद मिळाले व आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. `सहजयोगात माणूस आनंदीच राहतो.` असे एका फलकावर लिहिले होते आणि हे पूर्ण सत्य आहे.

# अध्याय चोवीस

ऑस्ट्रियन योगींनी लिसा, जी नेपाळमध्ये रहात होती, तिथे, नेपाळमध्ये कार्यक्रम करण्याची नम्र विनंती केली. २९ मार्चला श्री माताजी काठमांडूला पोहोचल्या. विमानतळावरून जातांना श्री माताजी पशुपतीनाथच्या मंदिरावरून गेल्या. मार्च १९७७ मध्ये जेव्हा श्री माताजी इथे आल्या होत्या तेव्हा श्री.राजेश शाहला त्या साक्षात् श्री शिवस्वरूपात दिसल्या होत्या.

लिसाने विचारले, `श्री पशुपतीनाथच्या मंदिराबाहेर कामूक मुर्त्या का बनविल्या आहेत?` `ही तांत्रिकांची विनाश बुद्धी आहे. त्यांनी मंदिराच्या बांधकामाच्या वेळेस सांगितले, की जर ह्या शृंगारिक मूर्त्या इथे असतील तर श्री विष्णूमाया (वादळ, वीजा, पाऊस) इथे कधी येणार नाही. कारण श्री विष्णूमाया कुमारिका आहे.` ह्या भ्रष्ट कल्पनेमुळेच खजुराहो आणि कोणार्कमध्ये ही शृंगारिक मूर्त्या आहेत. लैंगिकतेने देवापर्यंत पोहोचता येते, ही घाणेरडी व किळसवाणी कल्पना तांत्रिकांनी माणसाच्या डोक्यात घातली.

लिसा, `लिंग हे सुपकतेचे (फर्टिलिटी) प्रतिक आहे का?`

श्री माताजी, `जेव्हा आदिशक्ती श्री सदाशिवापासून वेगळ्या झाल्या, त्यांनी लंबवर्तूळाकार गतीत श्री सदाशिवांभोवती प्रदक्षिणा केली. लिंग हे त्याचे प्रतीक आहे.

लिसा, `तांत्रिकांची थोडी माहिती सांगाल का?`

श्री माताजी, `तांत्रिक हे अघोरी विद्येचे लोक आहेत. ते साधकांना भरकटवतात. देवापासून दूर नेतात. कुंडलिनीचा अपमान होतो. चक्रांवरून देवाची शक्ती दूर्बळ होते.`

सब कॉन्शस आणि सुप्रा कॉन्शसमधून भूतलोकांतील बाधा आपल्यात शिरतात. ते साधकाचे मन आणि बुद्धी भ्रष्ट करतात.

लिसा, `तांत्रिक संमोहित कसे करतात?`

श्री माताजी, `ते डोळ्यांनी संमोहित करतात. त्यांच्या बाधा आपल्यामध्ये घालतात.`

लिसा, `लैंगिकता आणि आध्यात्मामध्ये काय नाते आहे?`

श्री माताजी, `काहीच नाही.` कुंडलिनी मूलाधारात आहे आणि मुलाधार चक्र कुंडलिनीच्या खाली आहे. मुलाधार चक्राची देवता श्री गणेश अबोधिततेचे प्रतिक आहे. आपले लैंगिक अवयव पेल्व्हिक प्लेक्सेस मुलाधार चक्रात आहेत. कुंडलिनी आणि पेल्व्हिक प्लेक्सेसचा काहीही संबंध नाही. पती-पत्नीमध्ये लैंगिकता एक नैसर्गिक इच्छा आहे.

सदैव लैंगिकता व चित्त असल्याने डोळे व बुद्धी खराब होते. ख्रिस्तांनी म्हटले आहे, `तुमचे डोळेसुद्धा व्याभिचारी नकोत (दाऊ शॅल नॉट हॅव ॲडल्टरस आईज)`. नेपाळला कुंडलिनीचे (म्हणजे भारत) रक्षण करण्याकरिता बनविले होते. पण तांत्रिक विद्येने इथे सर्वनाश केला व दारिद्र्याला आमंत्रण दिले. पण इकडे लक्ष्मीतत्त्व जागृत करायला मी आता आले आहे.

# अध्याय पंचवीस

२३ एप्रिलला क्लिंटनव्हिला, इंग्लंड येथे श्री हनुमान पूजा झाली. `तुम्ही निर्भयपणे प्रचार-प्रसाराचे काम करा. परम चैतन्य तुमच्याबरोबर आहे. जगाचे परिवर्तन करायचे आहे.`

अमेरिका येथे नॅपल्स विमानतळावर सुमारे ३५ देशाचे १००० सहजयोगी श्री माताजींच्या स्वागताकरिता आले. श्री माताजींचे विमान पोहोचताच पाऊस थांबला व सूर्यदेवाने दर्शन दिले.

सोरेंटोमध्ये सहस्रार पूजा व सेमिनार झाला. सोरेंटोच्या महापौरांनी (मेयर) शहराच्या किल्ल्या श्री माताजींना अर्पण केल्या. तेथील पारंपारिक नृत्य व संगीताचा कार्यक्रम श्री माताजींकरिता आयोजित केला गेला. `सिटींग इन दि हार्ट ऑफ दि युनिव्हर्स` हे भजन म्हणत असतांना सर्वांचे सहस्रार उघडले गेले. श्री माताजींच्या सहस्रारातून प्रकाश येतोय हा अद्‌भूत फोटोग्राफ (मिरॅकल फोटो) ह्या वेळेस आला. नॅपल्सला व्हॅसूव्हियस पर्वताचा ज्वालामुखी आणि त्याचा विध्वंस पाहून श्री माताजींना वाईट वाटले. हा एकादश रूद्राचा कोप आहे. हा येथील लोकांचा अहंकार कमी करण्याकरिता झालेला उद्रेक होता.

नॅपल्समध्ये श्री माताजींची टिव्हीवर मुलाखत झाली. ह्या कार्यक्रमात त्यांनी नॅपल्सच्या जनतेची प्रशंसा केली. येथील लोकांचे हृदय खूप मोठे आहे. त्यांना आईप्रती खूप प्रेम व आदर आहे.

मातृदिनी श्री आदिशक्तीच्या मुलांनी आपले प्रेमस्वरूप त्यांच्यावर सुंदर फुलांचा वर्षाव केला. श्री माताजींनी सर्वांना अनेक आशीर्वाद दिले. प्रत्येकाचे कार्ड, पत्र व भेटवस्तू श्री माताजींनी जपून ठेवल्या.

आता श्री माताजींचे चित्त पाश्च्यात्य संस्कृतीत वाढणा-या मुलांवर गेले. `त्यांची अबोधिता जपायला पाहिजे.` तलनू, धर्मशाळा येथे त्यांनी श्री.योगी महाजनांना फोन केला. `आपण धन्य झालो, की स्वत: आदिशक्तींनी आपल्याला हा सन्मान दिला,` ह्या भावनेने त्यांनी आपली जमीन सहजयोगाला दिली व २१ मे ला ७ मुलांपासून तिथे शाळा सुरू झाली.

स्पेनमध्ये कार्यक्रमानंतर श्री माताजी ग्रीसला गेल्या. २४ मे ला अथेना पूजा झाली. अथेना हे आदिशक्तीचा अवतार आहे. ग्रीस हे देवलोक (पृथ्वीवरचे) होते. पण इथल्या लोकांनी देवाला मानवीस्वरूप दिले आणि ते अध्यात्मापासून दूर झाले. कुंडलिनीचे ज्ञान असूनही ह्या लोकांनी ते हरवले.

संध्याकाळच्या कार्यक्रमात श्री माताजी म्हणाल्या, साधक परिवार, पैसा आणि सत्तेच्या मागे धावला तर त्याला आनंद कधीच मिळणार नाही.

ग्रीसहून श्री माताजी इस्तंबूलला जाणार होत्या. ग्रीक साधकांनी श्री माताजींबरोबर जायची इच्छा व्यक्त केली. पण विमानात जागा नव्हती. बंधन दिल्यावर ७ आरक्षण रद्द झाली आणि नंतर परत १२ आरक्षणे रद्द होऊन दैवी लिलेने सर्व मुलांना आपल्या आईबरोबर प्रवासाची संधी मिळाली. इटालियन सहजयोगिनी कार्ला मोटिना इस्तंबूलमध्ये रहात होती तिथे हिल्टन कन्व्हेशन सेंटरमध्ये कार्यक्रमाची तयारी केली होती व पूजा तिच्या घरी करण्यात आली. `टर्कीमध्ये अक्कतूर केमल पाशा नावाचे साक्षात्कारी संत होऊन गेले. त्यामुळे लोकांमध्ये अध्यात्माची जाणीव होती.

`माझे प्रेम सूर्यप्रकाशासारखे आहे, जे सर्वांवर एकसारखे प्रकाशित होते. तुम्हाला सूर्याच्या दिशेने वाटचाल करावी लागेल. मगच तुम्ही माझ्याजवळ याल.`

# अध्याय सव्विस

अमेरिका दौ-याची सुरुवात जूनला विराट पूजेने झाली. स्थळ होते कनेक्टिकट. `सकाळी लवकर उठा, ध्यान करा व एक शिस्तबद्ध आयुष्य जगा.`

दुस-या दिवशी न्यूयॉर्कमध्ये कार्यक्रम झाला. अमेरिकेची महाकाली शक्ती जागृत करण्याची गरज होती. मुलाधार दुर्बळ असल्याने महाकालीदेखील जागृत नव्हती. दोनदा श्री महाकाली पूजा करण्यात आली. एकदा व्हॅनकूव्हर व नंतर सॅन दिएगोला. लॉस एंजिलिस, मियामा, बोगोटा, सॅल्व्हेडोर आणि रिओ दी जानेरोमध्ये कार्यक्रम करून श्री माताजी न्यूयॉर्कला परतल्या. तिथे त्यांना यूनायटेड नेशन्सने शांती पुरस्कार दिला. मग यूरोप दौरा सुरू झाला. फ्रान्समध्ये देवी पूजा व म्यूनिचमध्ये परम चैतन्य पूजा झाली.

`आपण आईच्या पोटात असतांना आपले पहिले पोषण आई करते. गुरूमध्येदेखील आईसारखे गुण पाहिजे. गुरूने शिष्याचे पोषण केले पाहिजे.`

रशियात आदिशक्तीच्या प्रेमाने जागृती झाली. सोवियत हेल्थ मिनिस्टरीने लाइफ इटर्नल ट्रस्टबरोबर संशोधनाचा करार केला. सहजयोगात उपचार कसे होतात ह्यावर रशियन शास्त्रज्ञांनी संशोधन केले. आश्चर्य आहे, की ज्या देशाने कधी देव मानला नाही, त्याने सहजयोगाला मान्यता दिली. `कारण त्यांची शुद्ध बुद्धी आहे, म्हणून ते पूर्ण सत्य ओळखू शकतात.`

६ ऑगस्टला इटलीमध्ये श्री भैरवनाथ पूजा झाली. स्विझर्लंडच्या श्री गणेश पूजेत श्री माताजींनी वात्सल्य आणि मातृत्वाबद्दल सांगितले. इंग्लंडमध्ये श्री कृष्ण पूजा आणि फिनलंडमध्ये श्री देवी पूजेनंतर श्री माताजी सेंट पिटर्सबर्ग, रशियामध्ये परत गेल्या. तिकडचे योगी आतुरतेने आईची वाट पहात होते. हजारो लोक कार्यक्रमाला आले. जिथे श्री माताजींनी पाय ठेवले त्या जमिनीला त्यांनी नमन केले. आईच्या साडीच्या पदरावर नतमस्तक झाले. `तुम्हाला माझ्याबद्दल कसे कळले? इथे काही प्रचार-प्रसार केला नव्हता किंवा इथे सहजयोगाची पुस्तकदेखील नाही.` आई, फक्त तुमचा फोटो पाहून आम्हाला समजले, की तुम्हीच आदिशक्ती आहात. टिव्हीवर श्रीमाताजींची क्लिप पाहून पॅलेस ऑफ युथ हॉलमध्ये दहा हजार साधक आले. हॉल १४०० लोकांकरिता होता. हजारो लोक शांतपणे बाहेर थांबले. शंभर वर्षे त्यांनी ह्या दिवसाची वाट पाहिली होती. आतमधल्या साधकांना जागृती देऊन श्री माताजी बाहेर आल्या. रशिया जगाला आध्यात्मात प्रगतीशील करणार म्हणताच थंड चैतन्य वाहू लागले. तत्क्षण सर्वांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. `मला कधी वाटले नव्हते रशियन लोक इतक्या संख्येत सहजयोग प्राप्त करतील!`

मॉस्कोमध्ये सुद्धा भरभरून प्रतिसाद मिळाला. दुस-या दिवशी `थ्रड` नावाच्या एका स्थानीय वृत्तपत्राने श्री माताजींच्या उपचाराबद्दल बातमी छापली. बाजारात `गम्प्स` नावाच्या एका सुपर मार्केटमध्ये एका मुलीने श्री माताजींना ओळखले. क्षणात पूर्ण बाजार आत्मसाक्षात्काराच्या कार्यक्रमात परिवर्तित झाला. यूक्रेनच्या साधकांनी श्री माताजींना किव ला आमंत्रित केले. पारंपारिक पोषाख घालून ब्रेड, मीठ, फळे, फुले, चॉकलेट, कूकीज, एम्ब्रॉयडरीचे रूमाल इ.घेऊन ते श्रीमाताजींच्या स्वागताला आले. यूक्रेनचे लोक `लव`चे वंशज आहेत. म्हणून त्यांचे माझ्यावर इतके प्रेम आहे. त्यांना परत द्यायला श्री माताजींकडे काहीही उपहार नव्हते. म्हणून श्री माताजींनी आपल्या अंगावरचे दागिने व बॅगेतील साड्या सर्वांना भेट म्हणून दिल्या.

# अध्याय सत्तावीस

सहजयोगाच्या उपचाराबद्दलचे चमत्कार रशियाचे राष्ट्रपती गोर्बाचेव पर्यंत पोहोचले. त्यांनी विश्व योगा संमेलन (वर्ल्ड कॉन्फरन्स ऑन योगा) मध्ये भाग घेण्यास श्री माताजींना आमंत्रित केले. चाळीस मिनिटे त्यांनी भाषण दिले. उपस्तित सर्वांना आत्मासाक्षात्कार प्राप्त झाला व थंड चैतन्यलहरीदेखील जाणवल्या. राष्ट्रपती गोर्बाचेव यांना श्री माताजींना भेटायचे होते, पण इटलीमध्ये दिवाळी पूजा आयोजित केली असल्याने श्री माताजींना थांबता आले नाही.

दिवाळी पूजेत `आय लव्ह यू` चा फुगा घेऊन एका लहान मुलीने श्री माताजींचे स्वागत केले. पिसामध्ये दिवाळी उपहारांची खरेदी केली. फ्लोरेन्समध्ये देबु चौधरींचा स्केच सांता मरिया प्लाझामध्ये एक कलाकार काढत होता. श्री माताजींनी स्वत: तो स्केच पूर्ण केला.

इटलीनंतर इस्तंबूलमध्ये कार्यक्रम झाला. येशूला क्रॉसवर चढविल्यावर मदर मेरी पश्चिम टर्की एपेससमध्ये राहिल्या होत्या. दुस-या दिवशी श्री माताजी रशियाकरिता भेटवस्तु घ्यायला बाजारात गेल्या. `माझे प्रेम दाखवायला पैसे खर्च करायला आवडतात.`

१३ डिसेंबरला भारताच्या राष्ट्रीय टेलिव्हिजन दूरदर्शनवर श्री माताजींचा कार्यक्रम झाला. टिव्हीकडे हात करूनसुद्धा लोकांना जागृती मिळाली. दुस-या दिवसापासून सहजयोगाच्या सर्व केंद्रांवर लोकांची गर्दी वाढू लागली.

श्री माताजींना खूप आनंद झाला. लोकांपर्यंत पोहोचणे मोठी समस्या आहे. माझ्या फोटोमध्ये कोणत्याही मूर्तीपेक्षा जास्त शक्ती आहे. स्वयंभूत पण चैतन्य असते, पण ते आत्मसाक्षात्कार देऊ शकत नाही. माझ्या फोटोमध्ये माझी इच्छा शक्ती असते म्हणून साधकाला जागृती मिळते.

१७ डिसेंबरपासून भारत दौ-याला सुरूवात झाली. अलिबागच्या पूजेने ही सुरूवात झाली. `साक्षीभावाने सर्व बघा. तुमचे चित्त आत घ्या. आवडनिवड बाजूला करा. मला आवडते, हे वाक्य गेले पाहिजे.`

महाराष्ट्र देशा आणि जोगवा मध्ये औरंगाबादचे साधक रंगुन गेले.

१९ तारखेला पैठणमध्ये दौरा पोहोचला. श्री सीतामाई इथे राहिल्या होत्या. गजेन्द्रमोक्ष इथेच झाला होता व ऋषी वाल्मिकीने रामायणदेखील गोदावरी किनारी लिहिले.

२१ तारखेला माताजी श्रीरामपूरला गेल्या. रस्त्यात श्री माताजी अस्वस्थ झाल्या. `हा रस्ता बरोबर नाही.` `तुम्हाला कसे कळले?` `कारण चैतन्य लहरी बरोबर नाहीत.` सहजयोग्यांनी चौकशी केली तर खरच रस्ता चुकलेला होता. श्री माताजींच्या कृपेने पूजेला पोहोचायला उशीर झाला नाही. पूजेत श्री माताजींनी सांगितले, की तुम्ही मला किती वस्तु देता हे जरूरी नाही. तुम्ही किती लोकांना पार करता हे जास्त महत्त्वाचे आहे. दुसरे म्हणजे तुमची प्रगती झाली का, हे पहा. तुम्ही ख-या अर्थाने स्वतंत्र झालात का? तुमचा अहंकार कमी झाला का? स्वत:चे आत्मनिरीक्षण करा, ते खूप महत्त्वाचे आहे?

पुण्याला परत येऊन खिसमस पूजा झाली.

एका कार्यक्रमात अंधश्रद्धा निर्मूलनाने परत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. २७ तारखेला वार्ताहर परिषद (प्रेस कॉन्फरन्स) बोलवून श्री माताजींनी ह्याचे उत्तर दिले. `मी स्वत: अंधश्रद्धेच्या विरूद्ध आहे. १९७० साली मी सर्व अगुरू व कुगुरूंचा निषेध केला आहे. माझे कार्य मानवाला पूर्ण सत्यात आणणे आहे.

पुण्याचे एक व्यापारी व दोन आर्किटेक्टनी ते सहजयोगाद्वारे कसे बरे झाले, ह्याचे वैद्यकिय प्रमाण सादर केले. सहजयोग उपचाराचे ऑस्ट्रिया, हेलसिंकी, बोस्टन आणि रशियामधील प्रयोग वार्ताहरांसमोर ठेवले गेले. श्री माताजी ह्या ओशोंच्या शिष्या आहेत असा दावा केला गेला.

१९७० साली मीच त्याच्या विरूद्ध लोकांना सावध केले होते. तो अबोध साधकांना नष्ट करतो.

साता-याच्या कार्यक्रमात अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांनी श्री माताजींना बोलू दिले नाही. शेवटी पोलीस बोलवावे लागले. तरी श्री माताजींनी त्यांना क्षमा केले. ब्रह्मपूरीला त्यांना भेटायला बोलावले. पण ही मंडळी ब्रह्मपुरीला आलीच नाही व संध्याकाळी अंगापूरच्या कार्यक्रमात पुन्हा दंगा केला. श्री माताजी व इतर सहजयोग्यांवर दगडफेक करू लागले. डॉ.दाभोळकर ह्याचे नेते होते. परम चैतन्य कार्यान्वित झाले आणि श्री माताजींना एकही दगड लागला नाही. अठरा सहजयोग्यांना मात्र मार लागला. नाडी ग्रंथात सांगितल्याप्रमाणे श्री कल्कीचा अवतार झाला होता. आदिशक्तीच्या कृपेत श्री कल्की आतमसाक्षात्कारी साधकांची सामूहिक चेतना झाली होती.

`ह्या लोकांना दगडफेकीचे पैसे दिले जातात. माझ्या विरूद्ध कार्य करण्यास ह्यांना पैसे मिळतात. म्हणूनच ब्रह्मपूरीला न येता एका छोट्या खेड्यात ते आले. सहजयोग्यांनी पोलीसात तक्रार केली. अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांनी सांगितले, की सहजयोग्यांनीच आमच्यावर दगडफेक केली. परंतु अठरा सहजयोगी जखमी होते व एकाही अंधश्रद्धा निर्मूलनचा कार्यकर्त्याला इजा झाली नव्हती. ह्याने सत्य बाहेर आले.

रात्रभर जागे राहून श्री माताजींनी जखमी योग्याची मलमपट्टी केली. दुस-या दिवशी सहस्र सूर्याचे तेज श्री माताजींच्या चेह-यावर होते, जणू काही झालेच नव्हते.

सांगलीला नववर्ष पूजा झाली. योगीजनांना पूजेत श्री माताजींना भेट द्यायची होती. `मला काहीही नको. तुम्ही फक्त ध्यान करा.`

# १९९० अध्याय अठ्ठावीस

३ तारखेला संध्याकाळी श्री माताजी गणपतीपुळेला आल्या. येताक्षणी आपल्या मुलांच्या सोईंची चौकशी आईने केली. `मांडवावर जाड कापड घाला. पाऊस आला तर काय सोय आहे? जेवणात आणखीन फळे व भाज्या पाहिजेत. गोड पदार्थ आणखीन पाहिजे. आचा-याला ही पाककृती द्या. ती माझ्या आईची आहे.` निर्मल प्रेमाचा सागर अनंत होता.

श्री हिमालयाचा मंत्र म्हणताच ऊन कमी झाले व पाश्चात्य योग्यांना आराम वाटला . संध्याकाळच्या सोहळ्यात सर्वजण चैतन्यात न्हाऊन निघाले. `चित्त सहस्रारात ठेवा. त्याने माझ्या चैतन्य लहरी तुम्ही नीट घेऊ शकाल. श्री माताजींच्या सल्ल्यात व देबू चौधरींच्या सतारीच्या रागांमध्ये सर्वजण तल्लीन झाले. आत्म्याच्या स्वास्थ्यानंतर शारीरिक स्वास्थ्याकरिता सर्वांना हाताने विणलेल्या शाली श्री माताजींकडून भेट मिळाल्या.

७ जानेवारीला आदिशक्ती पुजा करण्यात आली. `पुजेमध्ये माझ्या चक्रांवरील देवता जागृत होतात. त्याच्यातून प्रचंड चैतन्य वाहते. ते तुम्हाला ग्रहण करता आले पाहिजे.` पुजेत प्रत्येक देशाला पुजेमध्ये लागणा-या चांदीच्या वस्तु भेट म्हणून मिळाल्या. स्वत: मात्र श्री माताजींनी कोणाकडूनच भेट घेतली नाही. `मला माहीत आहे, तुम्ही माझ्यावर खूप प्रेम करता. म्हणून मला काही भेटवस्तु देण्यास उत्सुक असता. मला प्रसन्न करणे खूप सोपे आहे. एखाद्या पानाने, फुलाने किंवा फळाने पण मला आनंद होतो. पण त्यात भक्ती पाहिजे. महा वस्तुंवर पैसे खर्च करण्याचीगरज नाही.`

अंगापूरमध्ये झालेल्या गोंधळाबद्दल श्री माताजी म्हणाल्या, की कोणाचा द्वेष करून प्रतिक्रिया दर्शवू नका. क्षमा व करूणेमध्ये खूप ताकद असते. जरी मी कोणाला रागवले तरी त्यामागे माझे प्रेम असते.

महाराष्ट्र जगाची कुंडलिनी आहे आणि अष्टविनायक ह्याचे रक्षण करीत आहेत. राक्षसी शक्त्या ह्यावर प्रहार करीत आहेत. म्हणून माझ्यावर हल्ला झाला.

ह्या विरूद्ध सहजयोग्याने शांती मोर्चा काढला. २००० योगी ह्या मोर्चात सामिल झाले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी स्वत: ह्या प्रकरणात लक्ष द्यायचे आश्वासन दिले.

१४ जानेवारीला संक्रांत पूजा कळव्याला झाली. श्री माताजींना आराम मात्र नाही मिळाला. लगेच त्या चेन्नईला गेल्या. 8 फेब्रुवारीला पत्रकार परिषदेत सर्व पत्रकारांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. संध्याकाळी कला क्षेत्राच्या कलाकारांनी नृत्यनाट्याद्वारे सदाशिव व आदिशक्तीचे वर्णन केले. सृष्टीची रचना कशी झाली, ते दाखवले. आदिशक्ती सदाशिवांपासून वेगळ्या झाल्या व सृष्टीच्या रचनेची दैवी लिला केली. हे सर्व श्री सदाशिव साक्षीभावाने पाहत होते. आदिशक्तीच्या शक्त्या नंतर श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती व श्री महाकालीच्या स्वरूपात आल्या.

हे संगीत नृत्य श्री माताजींना खूप आवडले.

तामिळनाडू एम्पोरियममध्ये खरेदी करून तेथील हस्तकलेला प्रोत्साहन दिले. आश्चर्याने तेथील लाकडी कोरीवकाम केलेले दरवाजे व लाकडी देवाच्या मुर्त्या बरोबर प्रतिष्ठानमध्ये लागेल ह्याच मापाचे होते.

पुढच्या कार्यक्रमाला खूप बौद्धिक आणि वैज्ञानिक लोकांची गर्दी होती. शांतपणे सर्वांच्या प्रश्नांची उत्तरे श्री माताजींनी दिली. सुमारे पाच तास त्या सर्वांवर कार्य करीत होत्या. दोनशे साधकांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला.

`सहजयोग एक जिवंत प्रक्रिया आहे. बौद्धिक लोकांना फक्त त्याबद्दल बोलून समजणार नाही. त्यांना त्याचा अनुभव द्यावा लागेल.`

बेंगलोरला नंतर कार्यक्रम झाले. तिकडचे श्री.मुदप्पा राष्ट्रपतींचे सचिव असल्यापासून श्री.श्रीवास्तवांना ओळखत होते व श्री माताजींच्या दैवी स्वरूपाबद्दल त्यांना माहीत होते. स्वत:च्या घरात त्यांनी सहजयोगाचे कार्यक्रम आयोजित केले. सहजयोग्यांना हसतहसत श्री माताजी म्हणाल्या, `बघा, परम चैतन्य कसे सगळे कार्यान्वित करते. परम चैतन्यावर सर्व सोडून द्या व तुम्ही त्याची लिला बघा.`

श्री.जयकर : श्री माताजी अहंकार म्हणजे भूतबाधा आहे का?

श्री माताजी : नाही अहंकार एक भ्रम आहे.

श्री.जयकर : तो कसा नष्ट होतो?

श्री माताजी : आत्मनिरीक्षणाने. अहंकाराला फक्त साक्षीभावाने बघा. अहंकाराशी लढलात तर प्रतिअहंकार तयार होतो.

श्री महिषासुरमर्दिनी पूजा करून बेंगलोरच्या सामूहिकतेची नकारात्मकता नष्ट झाली. महिषासूराचा वध करतांनासुद्धा देवीच्या डोळ्यात करुणा असते.

# अध्याय एकोणतीस

१४ आणि १५ फेब्रुवारीला दोन सामूहिक कार्यक्रम अहमदाबादला झाले. `गुजराती लोकांचे चित्त अजूनही पैशावर आहे. पण त्यांनी सहजयोग केला तरच त्यांना श्री महालक्ष्मीचे सर्व आशीर्वाद मिळतील.

२३ फेब्रुवारीला महाशिवरात्र पुण्यात साजरी झाली. `परम चैतन्य सर्व जीवंत कार्य करीत असते. साधारण माणसांपासून आता तुम्ही साक्षात्कारी झाला आहात, हा परम चैतन्याचा आशीर्वाद आहे.`

हैद्राबादला ट्रेनने जातांना ज्या कप्प्यात श्री माताजी बसल्या होत्या, तेथील लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाला. लगेच बातमी पूर्ण ट्रेनमध्ये पसरली. काही वेळातच सर्वांना जागृती मिळाली. हैद्राबादला पोहोचून दुस-या दिवशी सर्व प्रवासी आपल्या कुटुंबियांना घेऊन कार्यक्रमाला हजर होते.

दक्षिणेमध्ये सहजयोग खूप पसरला नाही. `ही एक जीवंत क्रिया आहे. वाढ व्हायला वेळ लागेल.` आंध्रमधील धातुची मूर्ती श्री माताजींना आवडली. त्यांनी सहजयोग्यांकरिता ५०० शिवाजी महाराजांच्या मूर्त्या बनवून घेतल्या. शिवाजी महाराज एक आत्मसाक्षात्कारी महापुरूष होते आणि ते शूरदेखील होते. सत्याची बाजू त्यांनी कधीही सोडली नाही.

मुंबईहून श्री माताजी ऑस्ट्रेलियाला गेल्या. मधे सिंगापूरला थांबल्या होत्या. `चीनमध्ये सहजयोग पसरला पाहिजे. चायनीज लोक ज्ञानी आणि पारंपारिक असतात. ते खूप लवकर सहजयोग आत्मसात करतील. इथे लाओत्से सारखे तत्त्वज्ञानी होऊन गेले. पण त्यांना समजायला आत्मसाक्षात्कारी असायला पाहिजे. तसेच झेनचे पण आहे.`

पर्थला पोहोचून श्री माताजींनी पाहिले की तिकडच्या चैतन्य लहरी लूप्त झाल्या होत्या. बरेच लोक सहजयोगाबाहेर होते. गटप्रमुख अहंकारी झाले होते. बरीच ध्यानकेंद्र बंद पडली होती व लोक आश्रम सोडून स्वत:च्या घरात रहात होते. `सामूहिकतेत राहणे हा सहजयोगाचा अविभाज्य भाग आहे. उत्थानाकरिता हे जरूरी आहे. कार्यक्रमात दोन एड्सचे रोगी बरे झाले.

मेलबर्नमधला पूर्ण वेळ सामूहिकतेच्या समस्या सोडविण्यात गेला.

श्री माताजींनी शांतपणे सर्वांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. पिंगळा नाडी थंड झाली, की आत्मसाक्षात्कार लगेच घडतो. मध्यरात्रीपर्यंत योग्यांवर श्री माताजींनी काम केले व सकाळी कैरन्सला निघाल्या. त्याआधी `सर्वांनी ध्यान करा व माझ्या ध्वनिफिती ऐका. दुस-या कोणाची भाषणे नाही,` असे बजावले. कैरन्सच्या महापौरांनी श्री माताजींना सांगितले, की एकप्रकारचे तारामासे (स्टार फिश) तेथील कोरल रीफ खात होते व ते नष्ट होत होते. `पहिले तुम्ही तुमची शक्ती जागृत करा. मग त्यावर काही समाधान निघेल.` परंतु महापौरांनी लक्ष दिले नाही. श्री माताजी ग्रेट बॅरियर रीफला गेल्या व डोळ्यात चमक येऊन त्या हसल्या, `पाहूया आपण काय करू शकतो!` दुस-या दिवशी हजारो तारामासे मरून पाण्यावर तरंगत होते. `मेयरला सांगा विश्वास ठेवा.`

ब्रिसबेनच्या वृत्तपत्रात श्री माताजींबद्दल खूप लेख आले. हे वाचून खूप साधक कार्यक्रमाला आले. संध्याकाळी श्री माताजींनी सांगितले, की होमिओपॅथीमध्ये अतीविचार केला जातो. सहजयोग तुमच्या आतून काम करीत काय समस्या आहे हे तुम्हालाच कळू शकेल. तीन नाड्या आणि सात चक्रे आहेत म्हणजे फक्त एकवीस कॉम्बिनेशन्स.

ऑस्ट्रेलियानंतर न्यूझिलंड आशीर्वादित झाले. न्यूझिलंडच्या सुप्रसिद्ध रेडियोवर श्री माताजींची थेट मुलाखत (लाइव्ह) झाली. मुलाखतकार शोधक दृष्टीचा होता. त्याने प्रथम वेडेवाकडे प्रश्न विचारले. मध्येच त्याने त्याने विचारले, `तुम्ही मसिहा आहात का?` लगेच त्याच्या हातातून थंड चैतन्य लहरी वाहू लागल्या व तो आनंदाने रेडियोवर सांगू लागला, `मला ह्या चैतन्याची जाणीव होत अहो. जणू माझ्या हातात एक हवेचा थंड गोळा आहे. श्री माताजी सांगत असलेल्या गोष्टीवर माझा आतार्यंत विश्वास नव्हता पण आता मला सर्व पटते आहे.` रेडियो स्टेशनमधल्या सर्व लोकांना श्री माताजींकडे हात करून आत्मसाक्षात्कार मिळाला. दुस-या हाताने ते सहस्रावरची हवा जाणू शकले.

सिडनी युनिव्हर्सिटी, हिल्टन हॉटेल आणि कॅनबेरामध्ये कार्यक्रम झाले. `सहजयोग आणि कुंडलिनी जागृती निर्विचार स्थितीकडे जाते. दुस-याची मदत करून आपली स्थिती गहन होते. ह्या स्थितीत माणूस करुणामयी, गतिशील व शक्तिमान होतो. साक्षीभावाने सर्व पाहतो.

२१ मार्चला गुडगाव येथे सभागृहात श्री माताजींचा वाढदिवस सहजयोग्यांनी थाटात साजरा केला.

# अध्याय तीस

श्री माताजी मुंबईला परतल्यावर मुंबईतपण वाढदिवस सोहळा व पुजा झाली. वीस वर्षे मुंबईत काम करूनसुद्धा सहजयोग जसा वाढायला पाहिजे होता तसा तो वाढला नव्हता. श्री माताजींना ह्याची खंत होती. मुंबईचे सहजयोगी कुठेतरी कमी पडत होते. परम चैतन्याला गहन लोक दैवी कार्याकरिता पाहिजे आहेत. योगीजनांनी कान पकडून माफी मागितली व पुढच्या वर्षापर्यंत प्रत्येक सहजयोगी शंभर लोकांना पार करेल असा निश्चय केला.

`आता तुम्ही देवाच्या साम्राज्यात आहात. ही तुमची सर्वात मोठी उत्क्रांती आहे. आता तुम्हाला लोकांना परिवर्तित करायचे आहे.`

जयपूरला आशीर्वाद देण्याची विनंती तेथील महाराज व महाराणी यांनी केली. दिल्लीला जाण्याआधी श्री माताजींनी जयपूरला मुक्काम केला. राजकुमारी दिव्य आत्मसाक्षात्कारी होत्या. राजपूत समुदाय अतिशय पारंपारिक व देवीभक्त असल्याने त्यांनी श्री माताजींना ओळखले. रजपूतांमध्ये गणगौर हा खूप मोठा सण असतो. महाराणींनी श्री माताजींची गणगौर स्वरूपात पुजा करण्याची प्रार्थना केली. `गणगौर म्हणजे श्री गणेश आणि श्री गौरी माता.` महाराणींनी श्री माताजींना राजस्थानी घाग-यात तयार केले. फुल, आरतीने पुजा केली.

राजस्थानी पक्वानांची मेजवानी श्री माताजींसमोर मांडली गेली. राजा व राणी स्वत: त्यांना वाढत होते. श्री माताजींनी विनम्रपणे सांगितले, की त्या खूप कमी खातात व सर्व जेवण प्रसाद म्हणून वाटले.

संध्याकाळी महाराज स्वत: गाडी चालवत श्री माताजींना सार्वजनिक कार्यक्रमाला घेऊन गेले. रजपुतांच्या पारंपारिक व मर्यादाशील राहणीमानाचे श्री माताजींनी कौतुक केले. `दुर्गाभक्त असल्याने तुम्ही मला सहज ओळखू शकता.` महाराज सहजयोगातील तंत्र लगेच शिकले. त्यांनी स्वत:चा एक महल सहजयोग ध्यानकेंद्र म्हणून श्री माताजींना अर्पण केला, पण श्री माताजींनी विनम्रपणे तो नाकारला. ध्यानकेंद्र सामान्य लोकांजवळ असले पाहिजे.

## अध्याय एकतीस

दिल्लीने वाढदिवस साजरा करून श्री माताजींचे स्वागत केले. १९९० हे एक नवीन आयाम (डायमेंशन) सुरू करेल. सहजयोगात पूर्णपणे स्थित व शुद्ध होण्यास श्री माताजींनी सर्वांना सांगितले. आपले गणेश तत्त्व दृढ करण्याची प्रार्थना पूजेत सामूहिकतेने केली. पुढील आठवड्यात श्री माताजी यमुनानगर व कर्नालला गेल्या. दानवीर कर्ण कुरुक्षेत्राच्या लढाईमध्ये इथे थांबले होते म्हणून ह्या जागेचे नाव कर्णाल असे पडले. हरियाणामधील शेतकरी लोकांनी सहज जागृती प्राप्त केली. एका मुक-बधीर मुलाची विशुद्धी उघडताच तो ऐकू व बोलू लागला. ही घटना वणव्यासारखी पसरली. हजारोने लोक कार्यक्रमाला येऊ लागले. सर्वांना जागृती मिळेल हे आश्वासन मिळाल्यावर ते शांत झाले. असेच रामलिला मैदानात पण झाले.

गृहमंत्र्यांनी दगडफेकीचे प्रकरण सोडविण्याकरिता श्री माताजींना स्वत:च्या घरी आमंत्रित केले. तिथे परांजपे म्हणून दूरदर्शनमध्ये काम करणारा इसम श्री माताजींच्या पाया पडला व माफी मागितली. दाभोळकरांनी मला चुकीचे मार्गदर्शन दिले असे श्री माताजींना सांगितले. श्री माताजींनी लगेच त्यांना माफ केले.

७ एप्रिलला श्री माताजी व सर सी.पीं.च्या लग्नाचा वाढदिवस थाटात साजरा झाला. `आईचे प्रेम सर्वोच्च असतले तरी पित्याचे प्रेम काही कमी नसते.`

आदिशक्ती पूजेने कोलकाता आशीर्वादित झाले. आदिशक्तीचा अवतार मानवाच्या उत्क्रांतीकरिता आवश्यक होता. पण महामाया स्वरूपाची गरज पण होती. कारण साधकाला त्याशिवाय जागृती मिळणे कठीण होते. ह्या पूजेत देबू चौधरींनी नवा राग तयार केला. `स्वानंदेश्वरी` मात्र कार्यक्रमानंतर त्यांनी कबुल केले, की ते काय राग वाजवत होते, त्यांना कळत नव्हते. फक्त बोटे हालत होती. श्री माताजी सर्व संगीताचा स्रोत आहेत.

श्रीमती तलवार नावाच्या सहजयोगिनीला श्री माताजी खरच आदिशक्ती आहेत का हा प्रश्न पडला. त्यांनी मनात श्री माताजींना प्रार्थना केली व म्हणाल्या, `कृपा करून मला दाखवा, की तुम्हीच आदिशक्ती आहात.` त्यावेळेस श्री माताजी श्री.हिमांशू शाहच्या घरी जेवत होत्या. तलवार ताईंनी श्री माताजींचा फोटो काढला. त्या फोटोत श्री माताजींच्या डोक्यावर चंद्र असल्याचे दिसते.

श्रीमती तलवारांच्या डोळ्यातून आश्रू येऊ लागले व त्यांनी आईची क्षमा मागितली.

# अध्याय बत्तीस

इंग्लंडने इस्टर पूजेने श्री आदिशक्तीचे स्वागत केले. `योग्यांची इच्छा असेल तरच परम चैतन्य कार्यान्वित होऊ शकते. परम चैतन्य शक्ती आणि सहजयोगी त्या शक्तीचे उपकरण (इन्स्ट्रूमेंट) आहेत.सामान्यपणाला योगात जागा नाही. विशेष सद्‌गुणाने परम चैतन्याशी एकरूप होऊ शकतो.`

इंग्लंडवरून श्री माताजी रशियाला गेल्या. चार महिन्यात सहाव्यांदा श्री माताजी रशियाला जात होत्या. मॉस्को विमानतळावर कळले, की श्री माताजींकडे व्हिसा नव्हता. इमिग्रेशन ऑफिसरकडे हसून बघताच त्याने लगेच श्री माताजींचा पासपोर्ट स्टँप केला. रशियन योगी आश्चर्यचकित झाले. रशियन टिव्ही वर श्री माताजी आल्याची बातमी प्रसारित झाली. कार्यक्रमाचे स्थळ फूटबॉल स्टेडियम ठरवावे लागले. कारण कोणत्याही सभागृहात इतके लोक मावले नसते. निर्मल संगीत सरितेचा सर्वांनी आनंद घेतला.

रशियाच्या आरोग्य मंत्रालयात सहजयोग ध्यान केंद्र सुरू होते. श्रीमाताजींनी तिकडच्या डॉक्टरांना यकृत, हृदय, स्प्लीन सहजयोगाद्वारे कसे बरे करता येईल ह्याची सविस्तर माहिती दिली. सहजयोग उपचाराबद्दल त्यांना शिकवले. त्यांनी रशियाचे मोठे हृदय व सत्य स्वीकारण्याचे ज्ञान ह्याचे कौतुक केले. रशिया आज्ञा चक्र आहे तर चीन आज्ञा चक्राचा मागचा भाग (बॅक आज्ञा) `हम क्षम` हा मंत्र सर्वांना श्री माताजींनी दिला. रशियानंतर अमेरिकेमध्ये श्री माताजी कार्यक्रमांकरिता गेल्या.

# अध्याय त्रेचाळीस

२८ मे ला सॅन दिएगो श्री योगेश्वर पूजेने आशीर्वादित झाले. श्री माताजींच्या माधुर्याने अमेरिकेचे हंसा चक्र उघडले. हंसा चक्र आपल्याला तारतम्य व विवेक देते. जर्मनीमध्ये हंसा चक्र पूजेनंतर खूप सुधारणा झाली होती. जर्मन लोक पहिले होते, जे रशियामध्ये आत्मसाक्षात्कार द्यायला गेले. बर्लिनची भिंत पाडल्यावर त्यांनी पूर्व जर्मनीला पूर्ण हृदयाने स्वीकारले होते. `अमेरिकेत सहजयोग गहन व्हायला पाहिजे. एका हंगेरियन सहजयोग्याने पूर्ण देशाला अध्यात्माकडे वळवले होते.` कॅलिफोर्नियाला दुष्काळ आहे हे ऐकून श्री माताजींना आश्चर्य वाटले. गच्चीत खुर्ची टाकून श्री माताजी बसल्या व पाहता पाहता पाऊस पडू लागला. तो पाऊस दोन दिवस थांबला नाही. पाण्याची समस्या संपली.

युनायटेड नेशन्स ने सहजयोग मेडिटेशन सोसायटीला मान्यता दिली. यू.एन.च्या पन्नास लोकांना जागृती मिळाली. त्यात एक मेक्सीकन साधक पण होता. पुढे त्याने मेक्सिकोमध्ये सहजयोग पसरवला.

दुस-या दिवशी सुप्रसिद्ध अपोलो थिएटरमध्ये श्री माताजींचा रेडियो इंटरव्ह्यू झाला. त्या दिवशी कार्यक्रमाला चारशे लोक आले. न्यूयॉर्कमधील प्रत्येक समुदायाचे लोक कार्यक्रमाला हजर होते.

जूनमध्ये श्री माताजींचे चित्त स्पेनकडे वळले. १४ वर्षे कार्य करूनही सहजयोग स्पेनमध्ये खूप पसरला नाही. परम चैतन्याने हे कार्यान्वित केले. स्पेनच्या राणीने श्री माताजींना आमंत्रण दिले व सांगितले गेली १४ वर्षे इथे एक अगुरू लोकांना भरकटवतो आहे. श्री माताजींनी हॉटेल व्हेलाकच्या कार्यक्रमात साधकांचे डोळे उघडले. बार्सिलोनामध्ये श्री महावीर पूजा झाली. `श्री महावीरांनी नरकाबद्दल पूर्ण वर्णन केले आहे. पण मला पुजेच्या दिवशी नरकाबद्दल बोलायचे नाही. पहिल्यांदा जागृती घ्या. मग कुंडलिनीच्या प्रकाशात सर्व स्पष्ट होईल. इकडच्या बायका नव-यांवर हुकूम गाजवतात म्हणून लक्ष्मी तत्त्व खराब आहे.`

ऑस्ट्रियाला कुंडलिनी पुजा करण्यात आली. ग्रीसची नाभी शुद्ध करण्याकरिता श्री महालक्ष्मी पूजा झाली.

# अध्याय चव्वेचाळीस

रशियन मुलांना कबूल केल्याप्रमाणे जुनमध्ये श्री माताजी रशियाला परत गेल्या. २८ जूनला मॉस्को येथील वैद्यकिय परिषदेमध्ये त्यांनी भाषण दिले. वैद्यकिय शास्त्राला पराआधुनिक शास्त्र म्हणून प्रस्तुत केले. सहजयोगातील उपचार पद्धती विज्ञानाशी संघटीत असल्याचे प्रमाण दिले. रशियन डॉक्टर समुदाय दंग राहिला. श्री चक्रावर एकाने रिसर्च सुरू केला. चैतन्य लहरी मोजण्याचे उपकरण शोधले. मॉस्को आणि सेंट पिटर्सबर्गमध्ये सहजयोगाचे नवीन युग सुरू झाले. सहजयोग परिवार आता खूप मोठा झाला होता. किवच्या वृत्तपत्रात `आय एम दि होली घोस्ट` म्हणून श्री माताजींनी जाहीर केले.

पुढील कार्यक्रम सोची इथे आयोजित केला होता, पण प्रत्येक शहराला वेगळा व्हिसा लागतो हे माहीत नव्हते. त्यातही काही चांगलेच झाले. मॉस्कोच्या बाहेर शास्तेरजिओव्हामध्ये आश्रमाकरिता घर (दाचा) मिळाले.

रशियाची नाभी उघडण्याकरिता श्री माताजींनी स्वत:च्या पैशाने हा दाचा (घर) विकत घेतला. आधीच्या मालकाने खूप फळे व भाज्या लावल्या होत्या. छोट्याशा दाच्याचा सुंदर आश्रम झाला.

भारतीय संगीतकार ट्रेनने मॉस्कोहून मिलानला निघाले. हंगेरीच्या सीमेवर ह्या लोकांना थांबवले गेले. कारण व्हिसा नव्हता. बंधन दिले व ते प्लॅटफॉर्मवर बसून राहिले. हंगेरीच्या इमिग्रेशन ऑफिसर्सना आत्मसाक्षात्कार मिळताच त्यांनी स्वत: सर्व लोकांना कारने सोडले. पण तोपर्यंत ट्रेन निघून गेली होती. एका यूगोस्लाव्हियन बसने सर्वांना मिलान आश्रमाच्या दरवाज्यापर्यंत सोडले, ते ही एक पैसा न घेता.

दक्षिण फ्रांसमध्ये १८ जुलैला गुरूपूजा साजरी झाली. संध्याकाळच्या कार्यक्रमात चैतन्य पौर्णिमा नावाचा राग तयार झाला. श्री माताजींच्या प्रेमात सर्व मग्न झाले. पूजेत गुरू तत्त्वाचे ज्ञान मिळाले.

लंडनमध्ये श्री.श्रीवास्तवांना नाईटहूडने सन्मानित केले गेले. हा सन्मान आयएमओच्या त्यांच्या विशेष कारकिर्दीकरिता होता. सर सी.पी. म्हणाले, `खरे तर हा पुरस्कार तुला मिळायला पाहिजे.`

जुलैमध्ये मॉस्को, बर्लिन, प्राग व बुडापेस्टमध्ये कार्यक्रम झाले. जर्मनीचा जर्म म्हणजे कुंडलिनी होय.

१ ऑगस्टला पुणे विद्यापीठाने श्री.श्रीवास्तवांचा नाईटहूड मिळाल्याबद्दल सत्कार केला.

# अध्याय पंच्चेचाळीस

६ ऑगस्टला श्री माताजींना लॉस एंजेलिसला एका कोर्टकेसकरिता जावे लागले. पाच वर्षापूर्वी मर्व्ह ग्रिफीन महामंडळाने श्री माताजी व इतर सहजयोग्यांना खूप त्रास दिला होता. नाईलाजाने श्री माताजींना त्यांच्यावर केस केली. ह्या केसची सुनावणी होती. केसबद्दलचे सर्व वकिली व कायद्यासंबंधी मुद्दे श्री माताजींनी स्वत: मांडले. पण केसचा निकाल लागायच्या आधीच परम चैतन्याने आपली शक्ती दाखवली व महामंडळाचे दिवाळे निघाले. पत्रकारांनी ह्याबद्दल श्री माताजींना विचारले. त्या म्हणाल्या, `काही लोक माझ्या व सहजयोगाच्या विरोधात आहेत. ह्यांनी माझा उत्साह कमी न होता मी विचार केला, की ही लोक अशी का आहेत? तेव्हा कळले सर्वांना आत्मसाक्षात्कार प्राप्त होणे शक्य नाही. ही अंतिम निर्णयाची (लास्ट जजमेंट) वेळ आहे. ह्या वेळेस लोकांनीच विचार करायला पाहिजे, की आपण कोणत्या बाजूला जायचे.`

दुस-या दिवशी श्री विष्णूमायेने आपले माधुर्य पसरवले. कोर्ट केसबद्दल विसरून सर्वजण रक्षाबंधन साजरे करण्याच्या तयारीला लागले. भावा-बहिणीच्या पवित्र नात्याचे तत्त्व श्री गणेशांपासून येते. श्री गणेश ह्या प्रेमळ नात्यात अबोधिता व पावित्र्य आणतात.

व्हॅनकुव्हरमध्ये श्री सरस्वती पूजा झाली. पूजेच्या आदल्या संध्याकाळी १६०० वेळा वीज कडकडली. हे संगणकामध्ये (कॉम्प्यूटर) झाले. श्री विष्णूमाया श्री आदिशक्तीच्या अवताराची घोषणा करीत होत्या.

श्री कृष्ण पूजा न्यूयॉर्कला ठरली होती. पण ह्या वेळी श्रीमाताजींना ती इंग्लंडमध्ये करायची होती. इंग्लंडच्या सहजयोग्यांची गडबड उडाली. पूजेच्या स्थानाकरिता त्यांनी श्री माताजींची मदत मागितली. `थेम्स नदी आणि समुद्राच्यामध्ये जिथे उतार आहे आणि खूप बोटी दिसतात अशी जागा शोधा.`

सर्वजण श्री माताजींनी वर्णन केलेले स्थान शोधण्याच्या कामाला लागले. हूबेहूब तशी जागा मिळाली. जिथे खूप झाडेपण होती व ती नदी आणि समुद्राच्यामध्ये एका उतारावर होती. ही जागा म्हणजे इप्स्विच. पुजेत श्री माताजींनी आपल्या लहानपणीच्या गंमती सांगितल्या. `आधीचे संत-सन्यासी राहून आत्म्याला प्राप्त करीत, पण सहजयोग्यांना हेच काम गृहस्थआश्रमात राहून स्वत:च्या जबाबदा-या पार पाडून करायचे आहे. अनुकंपा फक्त स्वत:च्या परिवाराकरिता किंवा देशाकरिता नाही तर पूर्ण जगाकरिता पाहिजे.`

ह्या पूजेआधी हवन झाले. पूजेत श्री माताजींनी घोषणा केली, की आता कलीयुग संपले आणि कृतयुगाची सुरूवात झाली आहे. थंड चैतन्याने पूर्ण परिसर भरून गेला. `मी ह्या धरतीवर असेपर्यंत सहजयोग पूर्णपणे प्रस्थापित करेन.

# अध्याय एकोणपन्नास

२४ ऑगस्टला ऑस्ट्रियाला श्री गणेश पूजेचे सौभाग्य मिळाले. नदीकाठी लूनार्स बकला ही पूजा झाली. फुलं अर्पण करीत असतांना दैवी कृपा आकाशातून वाहू लागली. पाऊसासारखे दिसले, पण पाणी नव्हते. श्री माताजींनी ही प्रार्थना सर्वांना म्हणायला लावली. `श्री गणेश कृपावंत होऊन आम्हाला क्षमा करा व आमचे श्री गणेश तत्त्व जागृत करा.` अबोधितेचा आशीर्वाद सर्वांना मिळाला.

दुस-या दिवशी म्यूनिच, जर्मनीमध्ये श्री गृहलक्ष्मी पुजा झाली. जर्मनीतील सर्व गृहिणींना श्री माताजींनी भेटवस्तू दिल्या.

`श्री माताजी जगाचे तारण होईल का?`

`हे तुम्हा जर्मन लोकांच्या हातात आहे. तुम्ही सहजयोग स्वीकारलात तर तो जगाचे परिवर्तन करेल.` ३५० लोक ह्या कार्यक्रमाला आले होते. `जर्मन लोक आता खूप करुणामयी झाले आहेत.`

श्वेतझियर कॅसलमध्ये हनुमान पूजा झाली. श्री हनुमान तुमची पिंगळा नाडी सांभाळतात. ते एका लहान मुलासारखे गमती करून तुमचा अहंकार कमी करतात आणि सर्व गोष्टीत आनंद कसा द्यायचा हे शिकवितात. श्री माताजींनी हनुमाच्या गोष्टी ह्या वेळी सांगितल्या.

पॅरिसच्या कार्यक्रमात १४०० लोकांना दुसरा जन्म मिळाला. स्वत: श्री माताजींनी प्रत्येक साधकावर काम केले व त्याचे चक्र शुद्ध केले. परिणामार्थ सर्वांची उष्णता खेचून श्री माताजींचे पाय सुजले व त्यांना चालतापण येईना. सर्व सहजयोग्यांनी श्री माताजींच्या पायातून उष्णता काढली व सूज उतरली. श्री माताजी स्वत:ची काळजी न करता निरंतर काम करीत राहिल्या. साधकांच्या त्रासापुढे स्वत:चा त्रास त्यांना दिसत नसे.

पॅरिसच्या दुस-या कार्यक्रमापर्यंत नकारात्मकता पूर्ण संपली होती. निरानंदाचा आशीर्वाद सर्वांना मिळाला. `श्री महाकाली राक्षसांचा वध तर करतेच पण शुद्धिकरणपण करते व आनंद स्थापित होतो. इच्छाशक्ती फक्त प्रबळ पाहिजे. जगाचे कल्याण होऊ शकते.`

२३ सप्टेंबरला जिनिव्हामध्ये नवरात्री पूजा झाली. श्री माताजींनी सर्वांकरिता स्वत: स्वयंपाक केला. `द प्रिन्सेस सर्च` नावाचे नाटक सहजयोग्यांनी प्रस्तुत केले. ते श्री माताजींना खूप आवडले व परत दिवाळी पूजेत करायला सांगितले.

पुजेत श्री माताजींनी देवीने कसा राक्षसांचा संहार केला, पण आता ते परत आले आहेत व साधकांच्या बुद्धिमध्ये बसले आहेत, हे सांगितले. अगुरू, कुगुरू, चर्च, मंदिर या रूपात ही राक्षसी शक्ती परत कार्यान्वित झाली आहे.

देवीचे सर्व अस्त्र-शस्त्र श्री माताजींना पूजेत अर्पण केली गेली. ते हातात घेताच स्विस नाभी शुद्ध झाली.

## अध्याय पन्नास

१ नोव्हेंबरला क्वाललंपूरला सहजयोगाचा कार्यक्रम झाला. तेथील इस्लाम सरकारने कोणत्याही इतर धर्माला बंदी आणली असतांनाही ४०० साधक कार्यक्रमाला आले. मलेशिया मुलाधाराचा भाग आहे. तो पहिले भारताला जोडला होता.

मलेशियाहून थायलंडला आशीर्वाद प्राप्त झाले. श्री राम, श्री सीतेला वनवासात सोडल्यावर इथे राहिले होते. जेव्हा श्री सीतेचे अपहरण रावणाने केले तेव्हा सीतेने स्वत:चे दागिने ह्याच जागी टाकले म्हणून थायलंडमध्ये विविध प्रकारची रत्ने मिळतात.

थायलंडहून तैपईला श्री माताजी गेल्या. तेथील बुद्ध लोकांनी विचारले, `तुम्ही बुद्ध मैत्रयी आहात का?` सर्वांना थंड चैतन्य जाणवले.

भारतात पोहोचून पुण्याला श्री माताजींनी वृत्तपत्रांना मुलाखती दिल्या व एएसएनएसचे भांडे फोडले. राजकीय नेत्यांबरोबर रचलेला हा त्यांचा डाव होता. सर्वांचे डोळे उघडले व सत्य प्रकाशित झाले.

`काहीही झाले तरी सत्य बोलायला घाबरायचे नाही. सत्यात खूप ताकद असते.`

२२ तारखेला वैद्यकीय परिषदेत श्री माताजी बोलल्या. भारताच्या वेगवेगळ्या प्रांतातून ५०० डॉक्टर आले होते. `स्वयंचलित मज्जासंस्थेमध्ये हा स्वयं कोण आहे?` पूर्ण एकाग्रतेने डॉक्टर लोकांनी भाषणे ऐकली व आत्मसाक्षात्कार प्राप्त केला.

## अध्याय एक्कावन्न

डिसेंबरमध्ये भारत दौरा सुरू झाला. जगभरातून ५०० सहजयोगी आले. सर्वप्रथम त्यांना प्रतिष्ठानमध्ये जेवणाचे आमंत्रण मिळाले. साक्षात् अन्नपूर्णा देवीने आपल्या मुलांकरिता स्वयंपाक केला. जेवणानंतर बागेत गप्पा झाल्या.

दौरा पुढे श्रीरामपूर येथे गेला. हरेगाव साखर कारखान्यात सहजयोग्यांची रहायची सोय केली होती. एका कॉन्ट्रॅक्टरने काम नीट न केल्याने श्री माताजींनी त्याला ताकीद दिली. रागाने त्याने रात्री सहजयोग्यांच्या मांडवात साप सोडले. पण देवाच्या कृपेने कोणीतरी वेळेत ते पाहिले. श्री माताजींनी सर्वांना आश्वासन दिले, की सापसुद्धा योगी माणसाचे चैतन्य लहरी ओळखतात. ते तमुहाला कधीही चावणार नाही. सर्वजण श्री माताजींबरोबर बसले व लहान बाळासारखे झोपले.

श्री माताजींनी सर्वांकरिता धोतर आणि टोप्या आणल्या होत्या. दौ-यामध्ये काही दबाव, कडक कायदे नव्हते. आरामशीर वातावरणात चैतन्य लहरींचे नीट शोषण होते. बदल हा आतमधून आला पाहिजे. काय बरोबर वा काय चूक आहे हे स्वत:ला कळले पाहिजे.

भारत दौ-याचे महत्त्वाचे कार्य होते स्वत:चे चित्त शुद्ध करणे, प्रवास वा ठिकाण महत्त्वाचे नव्हते. श्री माताजींबरोबर प्रवास करणे म्हणजे सापशिडीच्या खेळासारखे होते. सहस्रारातून चित्त खाली घसरले म्हणजे सापाने गिळले तर लगेच श्री माताजी प्रेमाच्या शिडीने चित्त परत स्थिर करीत. हे ज्ञान कोणतीही शाळा किंवा विद्यापिठ देऊ शकले नसते. श्री माताजींच्या वात्सल्यात हे धडे प्रेममयी व आनंददायी होते.

वाजतगाजत दौरा लोणीला पोहोचला. `मला ओळखायचे असेल, तर स्वत:ला पहिले समजून घ्या.`

१७ तारखेला ब्रह्मपुरीत श्री ललिता चक्र व श्री चक्र पूजा झाली. कोल्हापूरला श्री महालक्ष्मी पूजा २१ तारखेला केली गेली. ही पूजा कोल्हापूरची श्री महालक्ष्मी मंदिराजवळ झाली.

हसत खेळत दौरा गणपतीपुळेला पोहोचला. समुद्र देवतेने आपल्या मुलांना शांत केले व त्यांचे आज्ञा चक्र शुद्ध केले.

ख्रिसमस पूजेत ओमकार म्हणजेच श्री गणेश आणि श्री येशू हे श्री माताजींनी सांगितले. ओमकार स्वरूपी चैतन्याचे फोटोदेखील आले. येशू आणि मेरीचा जन्म आधी झाला होता. पण आता साक्षात् श्री आदिशक्ती पूर्ण अवतारात आपल्या समोर आहेत. पूजेनंतर ८० जोडप्यांची लग्ने झाली. दैवी लिला आता गणपतीपुळ्याहून जागतिक स्तरावर कार्यान्वित होत होती.